


संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..

बांधिलकी जनहिताची

# नायक

सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने    कार्यकारी संपादक : श्याम तिवारी




▮ Sangamner ▮ MAHMAR/2018/75654 ▮ वर्ष ८ ▮ अंक १५४ ▮ २९/१०/२०२५ (दैनिक) ▮ किंमत रु.२/- ▮ पाने ६







# रक्तदाब वाढवणाऱ्या इंजेक्शनची संगमनेरात बेकायदा विक्री!

## छापा टाकत पोलिसांची कारवाई | विक्री करणाऱ्या तरुणाला अटक

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

हृदय आणि निम्न रक्तदाबाच्या रुग्णांवरील वैद्यकिय उपचारांसाठी वापरले जाणारे 'मेफेनटर्माइन सल्फेट' हे इंजेक्शन डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय विक्री करणाऱ्या एकाला शहर पोलिसांनी सोमवारी अटक केली. पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला याबाबतची माहिती मिळाली होती. त्यानुसार पालिकेजवळील शास्त्री चौकातील एका शॉपवर छापा घालीत पोलिसांनी ही कारवाई केली. यावेळी सदरील औषधाच्या प्रत्येकी दहा मिलीच्या तीन बाटल्यांसह सिरींज, मोबाईल, दुचाकी व रोख रक्कम असा एकूण दोन लाख २३ हजार १२० रुपयांचा मुद्देमालही हस्तगत करण्यात आला आहे. या कारवाईने शरीरसौष्ठव करणाऱ्या तरुणांना प्रोटीन्स विक्री करणारी ठिकाणं चर्चेत आली असून अन्न आणि औषध प्रशासनाची निष्क्रियताही उघड झाली आहे. या प्रकरणी शहर पोलिसांनी आदित्य गुप्ता याच्या विरोधात गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करीत त्याला अटक केली आहे, आज त्याला न्यायालयासमोर हजर केले जाणार आहे.




याबाबत संगमनेर शहर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार सदरचा छापा सोमवारी (ता.२७) दुपारी सव्वातीनच्या सुमारास घालण्यात आला होता. पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांना गोपनीय माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे उपनिरीक्षक श्रीकांत सावंत यांना कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार उपनिरीक्षक सावंत यांनी सुरुवातीला अन्न व औषध प्रशासनाचे निरीक्षक सोमनाथ मुळे यांना याबाबत सूचित करण्यासाठी **(पान ३ वर)**

(पान ३ वर)

■ अन्न व औषध प्रशासनासह निष्क्रियतेच्या शिखरावर असलेल्या शहर पोलिसांच्या या कारवाईने शहरात नशेसारख्या काय काय गोष्टी सहज कोठेही उपलब्ध होतात याचे जिवंत चित्रच उभे केले आहे. मध्यंतरी शहरातील महाविद्यालये व शाळांच्या आवारातील काही पानटपऱ्या व अन्य ठिकाणांवर गांजा, त्यापासून बनवलेल्या सिगारेट व अगदी एमडीसारख्या अतिशय घातक आणि आयुष्य बर्बाद करणाऱ्या अंमली पदार्थांची विक्री होत असल्याच्याही खूप चर्चा रंगल्या होत्या. मात्र या दोन्ही विभागांकडून त्याला खूपकाही महत्व दिले गेले नाही. त्यातून अशाप्रकारचे अंमलीपदार्थ विक्री करणाऱ्यांची हिम्मत वाढली असून विद्यार्थीदशेतील तरुणाई त्याच्या विळख्यात अडकण्याची भीती निर्माण झाली आहे. संबंधित विभागांनी वेळीच धोक्याची पावलं ओळखून संयुक्तपणे कठोर कारवाई करुन अशा उद्योगांचे समूळ उच्चाटण करण्याची गरज आहे.

# सोनसाखळी चोराला पोलीसांनी केले जेरबंद!

## दीड लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**नायक वृत्तसेवा, अहिल्यानगर**

गर्दीच्या ठिकाणी सोनसाखळी चोरी करणाऱ्या एका भामट्याला कोतवाली पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत जेरबंद केले आहे. चोरी गेलेला तब्बल दीड



लाखांचा सोन्याचा ऐवज पोलिसांनी आरोपीकडून हस्तगत केला असून या कामगिरीचे शहरातुन कौतुक होत आहे. दुपारच्या सुमारास अहिल्यानगर ते नाशिक बसमध्ये प्रवासी महिला चढत असताना गर्दीचा फायदा घेत चोरट्याने महिलेच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाचे ७५ हजार रुपये किंमतीचे मिनी गंठण आणि **(पान ३ वर)**


# तब्बल दोन किलो सोन्यासह सहा कारागीर फरार!

## सराफ बाजारात खळबळ; कोतवालीत गुन्हा दाखल

**नायक वृत्तसेवा, अहिल्यानगर**

शहरातील गजबजलेल्या सराफ बाजारातून तब्बल दोन किलोपेक्षा अधिक सोने घेऊन सहा कारागीर बेपत्ता झाल्याची सनसनाटी घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे सोनार व्यावसायिकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली असून, सराफ बाजारात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

फिर्यादी कृष्णा जगदीश देडगावकर (वय ३२, रा. गायकवाड कॉलनी, सावेडी रस्ता) यांनी सोमवारी (२७



ऑक्टोबर) कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यावरून पोलिसांनी दिपनकर माजी, सोमीन बेरा ऊर्फ कार्तिक, सोमनाथ सामंता, आन्मेश दुलोई, सत्तु बेरा, स्नेहा बेरा (पूर्ण नाव व पत्ता उपलब्ध नाही). या सहा संशयित कारागिरांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

देडगावकर बंधूंचे 'देडगावकर ज्वेलर्स' **(पान ३ वर)**



















सुविचार : विद्येच्या प्रकाशाने अज्ञानाचा अंध:कार नाहीसा होतो.

# गुन्हेगारीला उधाण

सातारा जिल्ह्यातील फलटण येथील एका डॉक्टर महिलेवर अत्याचार करून तिला आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा विषय सध्या गाजत आहे. या विषयामध्ये एका पोलीस अधिकार्याचा समावेश असल्यामुळे त्याला गांभीर्य निश्चितच प्राप्त झाले आहे. पण गेल्या काही दिवसांमध्ये घडलेल्या इतर विविध घटनांवर नजर टाकली तर गुन्हे आणि गुन्हेगार यांची हिंसक आणि विकृत मानसिकता प्रकर्षाने समोर येताना दिसत आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एका बापाने आपल्या १४ वर्षीय मुलीचेच लैंगिक शोषण केल्याची घटना नुकतीच घडली आहे. बुलढाणा जिल्ह्यामध्ये एका पित्याने किरकोळ कारणावरून पत्नीशी भांडण झाल्याने त्याचा राग मनात धरून आपल्या दोन जुळ्या मुलींची गळा चिरून हत्या केली. पिंपरी चिंचवड शहरामध्ये राजकारणामध्ये कार्यरत असलेल्या एका नेत्याने नगरसेवक होऊ पाहणार्या आपल्या पत्नीचीही हत्या केल्याची घटना नुकतीच समोर आली आहे. केवळ महाराष्ट्रातील घडणार्या घटना समोर येत असल्या तरी देशाच्या कानाकोपर्यात अनेक ठिकाणी अशा प्रकारचे गुन्हे सातत्याने घडत असतात. फलटण येथे घडलेल्या आत्महत्येच्या प्रकारामुळे कायदा व सुव्यवस्थेच्या विषयावर बोट जरी ठेवण्यात येत असले, तरी अशा प्रकारचे वैयक्तिक गुन्हे प्रतिबंधित करणे किंवा टाळणे कोणत्याही पोलीस खात्याला शक्य होत नाही हे वास्तव आहे. फलटणच्या घटनेमध्ये एक पोलीस समाविष्ट असल्यामुळेच ती घटना जास्त गंभीर आहे आणि अशा प्रकारच्या घटनांमध्ये प्रकरण दडपले जाण्याची भीती असल्यामुळेच त्याला महत्त्व द्यावे लागते आणि माध्यमांनीसुद्धा त्याच भूमिकेतून हा विषय सातत्याने लावून धरला आहे. गुन्हेशास्त्रातील नियमाप्रमाणे जे गुन्हे घडत असतात ते एकतर शरीराविरुद्धचे गुन्हे असतात किंवा मालमत्तेविरुद्धचे गुन्हे असतात. म्हणजेच मारामारी, खून, बलात्कार, खुनाचा प्रयत्न हे सगळे शरीराविरुद्धचे गुन्हे असतात आणि चोरी, दरोडे हे गुन्हे मालमत्तेच्या विरोधातील गुन्हे असतात. सतत अशा प्रकारचे गुन्हे कोठे ना कोठे घडतच असतात. या गुन्ह्यांचा छडा लावून गुन्हेगारांना शिक्षा देण्यामध्ये पोलीस खाते किती सक्षम आहे यावर कायदा व सुव्यवस्था अवलंबून असते. कोणत्याही शहराच्या कानाकोपर्यात किंवा निर्जन ठिकाणी एखादा गुन्हा जर घडत असेल तर तो गुन्हा घडू नये यासाठी पोलिसांना प्रत्यक्षपणे काहीच करता येत नाही. पण गुन्हा घडून गेल्यावर संबंधितांना शिक्षा देण्यासाठी मात्र पोलिसांची भूमिका महत्त्वाची असते. फलटणच्या घटनेनंतर गृहखात्याच्या कारभारावर आणि कायदा व सुव्यवस्थेच्या विषयावर जरी बोट ठेवण्यात आले असले, तरी या प्रकरणाचा व्यवस्थित तपास झाला नाही आणि गुन्हेगारांना शिक्षा झाली नाही तरच गृहखात्याला जबाबदार धरणे योग्य ठरू शकते. एखाद्या शहरात सातत्याने चोर्यामार्यांचे प्रमाण वाढले असेल, दरोडे वाढले असतील किंवा स्त्रियांविरुद्ध गुन्ह्यांचे प्रमाण वाढले असेल तर पोलिसांची अकार्यक्षमता लक्षात घेता येऊ शकते आणि पोलिसांचा वचक नाही असे म्हणता येऊ शकते. म्हणून पोलिसांनी आपला वचक निर्माण करणेसुद्धा महत्त्वाचे असते. गुन्हेगारांच्या मनात पोलीस खात्याबाबत आणि न्यायव्यवस्थेबद्दल वचक नसेल तर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत जाते.फलटणची घटना असो किंवा इतर काही हिंसक गुन्हेगारी स्वरूपाच्या घटना असो, त्याला जबाबदार असणार्या गुन्हेगारांना जोपर्यंत शिक्षा होत नाही तोपर्यंत कायदा व सुव्यवस्थेचे व्यवस्थित पालन झाले आहे असे म्हणता येत नाही. फलटणच्या घटनेमध्ये तर थेट पोलीसच सहभागी असल्याने या प्रकरणाचा अत्यंत गांभीर्याने आणि काळजीपूर्वक तपास करून गुन्हेगारांना कठोरात कठोर शिक्षा देण्याचे काम पोलीस व्यवस्थेला करावेच लागणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे एखादा गुन्हा घडण्यास नक्की कारण काय याचा विचार अनेक वेळा केला जातो. फलटणच्या घटनेमध्ये सुद्धा या आत्महत्याच्या घटनेचे कारण काय असावे याबाबत उलट सुलट दावे करून संबंधित महिलेचे चारित्र्यहनन करण्याचाही प्रयत्न केला जात आहे. ते सुद्धा टाळण्याची गरज आहे. गेल्या काही वर्षांचा अनुभव बघता जेव्हा जेव्हा महिलांविषयी अशा प्रकारचे गुन्हे घडतात तेव्हा विनाकारणच त्यांचे चारित्र्यहनन करण्याचे प्रयत्नही विविध प्रकारे केले जाते. महिला आयोग आणि इतर महिला संघटनांनीसुद्धा हा विषय प्राधान्याने समोर आणण्याची गरज आहे. अर्थात, कारण कोणतेही असले तरी एखाद्याचा जीव घेणे किंवा त्याला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे हा नेहमीच गंभीर विषय असतो. साहजिकच अशा प्रकारचे गुन्हे करणार्या गुन्हेगारांना जोपर्यंत कडक शासन होत नाही तोपर्यंत हिंसेची ही विकृत मानसिकताही कमी होणार नाही. म्हणूनच या ठिकाणी पोलिसांची जबाबदारी सर्वाधिक आहे. अत्यंत काटेकोरपणे तपास करून साक्षी पुरावे गोळा करून गुन्हेगाराला न्यायव्यवस्थेसमोर शासन देणे यालाच आता पोलीस प्रशासनाने प्राधान्य द्यायला हवे.



# मायावतीचे पुनरागमन

**‘उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीला एक ते दीड वर्षाचा अवकाश असताना आतापासूनच राजकीय हालचालींना वेग येत आहे. योगी आदित्यनाथ यांनी उत्तर प्रदेशमध्ये चांगलेच बस्तान बसविलेले असल्याने आगामी निवडणुकीत त्यांना मागे टाकणे वाटते तेवढे सोपे राहणार नाही. दुसरीकडे समाजवादी पक्ष आणि काँग्रेसकडूनही मोर्चेबांधणी केली जात आहे. तशातच आता बहुजन समाज पक्षाच्या सर्वेसर्वा मायावती यांनीही रणशिंग फुंकून संभाव्य रणनितीची झलक दाखविली.**

**■ अमित शुक्ल**

नऊ वर्षांनंतर बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख मायावती ऊर्फ ‘बहनजी’ यांनी अलिकडेच लखनौच्या एका राजकीय कार्यक्रमातून जोरदार पुनरागमन केले. पक्षाचे संस्थापक कांशीराम यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात जोरदार शक्तीप्रदर्शन केले. गेल्या काही काळापासून सुस्तावलेल्या कार्यकर्त्यांत पक्ष भावना प्रज्वलित केली आणि राजकीय मोर्चेबांधणीला बळकटी आणली. लखनौच्या कांशीराम स्मारक स्थळावर आयोजित सभेत बोलताना मायावती यांनी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे कौतुक करत असताना समाजवादी पक्ष आणि काँग्रेसवर हल्लाबोल केला. त्याचवेळी २०२७ मध्ये बहुजन समाज पक्षाचे सरकार स्थापन करण्याचे देखील आवाहन केले.

देशाच्या राजकारणात मोलाची भूमिका बजावणाऱ्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीला आणखी वेळ असताना मायावती यांचे शक्तीप्रदर्शन आणि राजकीय इच्छाशक्ती पाहता उत्तर प्रदेशची जनता मायावती या आगामी राजकीय रणसंग्रामासाठी सज्ज होत आहेत का? असा विचार करण्यास प्रवृत्त झाले आहेत. अर्थात बहुजन समाज पक्ष हा अचानक जागा झालेला नाही. तो शांतपणे वाटचाल करत होता आणि पक्षाचे चिन्ह ‘हत्ती’ हा बिगुल वाजविण्यासाठी योग्य वेळेची वाट पाहत होता. मायावती यांनी भाचा आकाश आनंद याला देखील अलिकडेच प्रकाशझोतात आणले आहे.

**समाजवादी पक्ष-काँग्रेसवर टीकास्त्र**

मायावती यांनी तासभर केलेल्या भाषणात बसपच्या निवडणूक अभियानाचा बिगुल फुंकला आणि समाजवादी पक्ष आणि काँग्रेसवर जोरदार टीकास्त्र सोडले. दोन्ही पक्ष लबाड आणि जातीवादी असल्याचा आरोप करत या पक्षांकडून दलितांचा वारंवार अपमान झाल्याचाही दावा केला. दोन्ही पक्ष दुतोंडी आणि संधीसाधू असल्याचाही आरोप केला. त्या म्हणाल्या, ‘‘समाजवादी पक्ष हा सत्तेत असताना दलित समुदायाकडे दुर्लक्ष करते आणि गरज भासल्यास आठवण काढते. माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांच्या कार्यकाळात २०१० मध्ये जातीय राजकारण करत कांशीरामनगर जिल्ह्याचे नाव बदलून कासगंज केले आणि दलित समुदायासाठी काम करणाऱ्या संस्थांना निधी देणे बंद केले. कांशीराम स्मारकांची देखभाल केली नाही आणि त्याची हेळसांड करण्यात आली. राज्यातील जनतेने अशा संधीसाधू लोकांपासून सावध राहण्याची गरज आहे.’’

काँग्रेसवर टीका करताना त्या म्हणाल्या, काँग्रेसचे कांशीराम यांच्याप्रती दिसणारे प्रेम बेगडी आहे. २००६ मध्ये त्यांचे निधन झाल्यानंतर तत्कालिन सरकारने एक दिवसाचा देखील राष्ट्रीय दुखवटा पाळला नव्हता. मतपेढीसाठी सप आणि काँग्रेसचे नेते कांशीराम यांना आदरांजली वाहण्याचे ढोंग करतात, मात्र या पक्षाचे काम मात्र दलितविरोधी मानसिकता दाखविणारे आहे, असाही घणाघाती आरोप मायावती यांनी केला. संकुचित विचारांच्या आणि जातीवादाला थारा देणाऱ्या या दोन पक्षांपासून दूर राहण्याचे आवाहन देखील मायावती यांनी केले.

**बसपची शक्ती**

दलित आणि बहुजन समुदायाच्या सशक्तीकरणासाठी पुढाकार घेत १९८४ मध्ये कांशीराम यांनी बसपची स्थापन केली आणि कमी कालावधीत उत्तर प्रदेशच्या राजकारणात स्थान बळकट केले. बसपच्या काळातील सर्वोच्च बिंदू म्हणजे मायावती यांचे सरकार. २००७ मध्ये मायावती यांच्या नेतृत्वाखाली बसपचे सरकार स्थापन झाले. बसपने ३०.४६ टक्के मते घेऊन राज्यात संपूर्ण बहुमत मिळवले. हा एकप्रकारे ‘सोशल इंजिनिअरिंग’चा परिपाक होता. या माध्यमातून दलित, मागासवर्गीय आणि सवर्ण यांना आंबेडकरवादी विचारांच्या माध्यमातून एकत्र आणले. २०१२ नंतर पक्षाची चढती कमान उतरणीला लागली. २०१७ मध्ये भाजपशी आघाडी करत २२.२३ टक्के मिळाली, मात्र केवळ १९ जागांवरच समाधान मानावे लागले. २०१९ मध्ये बसपला १९.३ टक्के मिळाली आणि दहा जागा पटकावल्या. २०२२ मध्ये त्याचा वाटा आणखी कमी झाला आणि तो १२.८८ टक्क्यांवर आला आणि एकाच जागेवर समाधान मानावे लागले. २०२४ मध्ये तर आणखीच घसरण पाहवयास मिळाली आणि मतांची टक्केवारी ९.३९ वर येऊन पोचली आणि एकही जागा न मिळाल्याने पक्ष रसातळाला पोचला. भाजपच्या कल्याणकारी योजना आणि स्पर्धक चंद्रशेखर आझाद यांचा उदय झाल्याने दलित मतांत विभागणी झाली आणि त्यामुळे तरुण मतदार बसपपासून दूर गेला. या घसरणीतून संघटनात्मक बांधणीतील उणीवा आणि मायावती यांच्या बचावात्मक धोरण उघड झाले. या स्थितीत बसपची प्रासंगिकता कमी होत असल्याची चर्चा सुरू झाली. पण दोन दिवसांपूर्वीची सभा ही पक्षाची मरगळ दूर करण्याचा प्रयत्न वाटत असला तरी २०२७ च्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तयारीचा भाग म्हणून त्याकडे पाहता येईल. गेल्या काही वर्षात पक्षातंर्गत चढउतारानंतर एप्रिल महिन्यांत मायावती यांनी भाचा आकाश आनंद यास राष्ट्रीय समन्वयक म्हणून नियुक्त केले. या निवडीने पक्षाला दिशा आणि स्थैर्य आल्याची भावना कार्यकर्त्यांत निर्माण झाली.

बसपकडून राज्य पातळीवर जम बसविण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्मचा व्यापक वापर करण्यात येत आहे. पक्षाकडून ऑनलाइन मोहीम राबविण्यात येत असून सोशल मीडियावर पोस्ट आणि रीलच्या माध्यमातून तरुणांच्या मनात बसपचे विचार रुजविण्याचा प्रयत्न केला जात आहे. तूर्त बसप हा अखिलेश यादव यांच्या नेतृत्वाखालील ‘इंडिया’ आघाडीची उत्तर प्रदेशात नाकाबंदी करू इच्छित असून यादव यांचा पक्ष दलित भावनांचे शोषण करणारा आणि स्वाथी असल्याचे सांगितले जात आहे. ‘पीडीए’ समीकरणाला उत्तर देण्यासाठी बिगर जाट आणि ओबीसी यांना सामील करून बसप राजकीय मोर्चेबांधणी करण्याचे संकेत देत आहे. वर्ष २०२७ ला दीड वर्षाचा कालावधी शिल्लक असताना बसपचे पुनरुज्जीवन उत्तर प्रदेशातील राजकारणाचे चित्र बदलणारे ठरू शकते. बसपने येत्या काळात पक्षबांधणी आणि ऐक्य ठेवल्यास पूर्वीपेक्षा अधिक मते मिळू शकतात. एकंदरीत मायावती यांनी प्रचाराचा बिगुल फुंकला असून कदाचित राज्यात बसपचा बहर येऊ शकतो.

भाजपप्रती मवाळ भूमिका

मायावती यांनी मुख्यमंत्री आदित्यनाथ यांच्या सत्ताधारी भाजपबाबत मवाळ भूमिका घेतली आहे. बसपने राज्यात उभारलेले पार्क अणि स्मारकाची देखभाल केल्याबद्धल त्यांनी उत्तर प्रदेश सरकारचे आभार मानले. त्याचवेळी सपवर मात्र टीकेचे आसूड ओढले आहेत. त्या म्हणाल्या, उत्तर प्रदेशातील विद्यमान सरकारचे आपण आभार मनातो. कारण त्यांनी समाजवादी पक्षापेक्षा वेगळा अनुभव देत स्मारकस्थळी भेट देणाऱ्या नागरिकांच्या निधी अन्यत्र न वळविता स्मारकाच्या देखभालीवर खर्च केला. विशेष म्हणजे मायावती या स्वत: भाषण लिहतात आणि करतात. त्यामुळे त्या विचारांवर ठाम असतात. दुसरीकडे मायावती यांच्या मवाळ भूमिकेबाबत काँग्रेसने बसपवर हल्लाबोल करत मायावती या भाजपच्या इशाऱ्यावर काम करत असल्याचा दावा केला.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अजय राय यांनी मायावती यांची भूमिका म्हणजे कांशीराम यांचा विश्वासघात करण्यासारखे आहे. उत्तर प्रदेशात दलितांवर अत्याचार वाढलेले असताना आणि हरिओम वाल्मीकी हत्याकांड घडलेले असताना मायावती यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आहे.एकुणातच मायावती यांचे भाजपबाबत उदारमतवादी धोरण अणि काँग्रेस-सपवरची टीका पाहता त्यांची रणनिती स्पष्ट दिसते. उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजण्यापूर्वी मायावती यांनी पुढील वाटचालीचे संकेत दिले आहेत. त्याचवेळी चंद्रशेखर आझाद यांचा पक्ष देखील पश्चिम उत्तर प्रदेशात नावारुपास येत असून त्याने बसपच्या बालेकिल्ल्यास धक्के दिले आहेत. या पार्श्वभूमीवर लखनौतील मायावती यांचे शक्तीप्रदर्शन बसपला संजीवनी देणारे ठरू शकते.

# पिचलेल्या अन्नदात्याचे प्राक्तन

**हवामान बदलाच्या काळात होणाऱ्या नैसर्गिक संकटांमुळे होणारी मनुष्य अणि वित्तहानी तसेच शेत-बागायतीचे होणाऱ्या नुकसानीचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढले आहे. सरकारकडून समाधानकारक मदत मिळत नसल्याने कृषी क्षेत्र हा अधिक त्रासदायक क्षेत्र ठरत आहे. शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण सर्वात गंभीर असून त्यांचे कुटुंबीयही वाऱ्यावर पडल्याचे दिसून येते. खर्च, मेहनत, अडचणी, अनिश्चतेच्या भोवऱ्यात अडकलेल्या शेतकऱ्यांची उन्नती, प्रगती कधी होणार?**



**● शिवार**

यंदा पंजाब, हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, उत्तर प्रदेश, आसाम, राजस्थान, दिल्लीसह दक्षिणेतील बहुसंख्य राज्यांत सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. महाराष्ट्रातही काही भाग ओला दुष्काळाच्या छायेखाली आला आहे. या कारणांमुळे शेकडो गाव पाण्याखाली गेली आणि हजारो हेक्टरवरील पिकांची नासाडी झाली. या आस्मानी संकटामुळे शेतकऱ्यांचे लाखो कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. प्रामुख्याने पर्वतीय राज्यांत ढगफुटीच्या घटनांनी वित्तबरोबरच मनुष्यहानी देखील झाली आहे. शिवाय लाखो हेक्टरवरील उभे पिक वाया गेले. केंद्र सरकारने पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेशससह ओला दुष्काळाचा सामना करणाऱ्या राज्यांना मदत केली असून आणखी साह्य केले जात आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना संकटातून बाहेर पडण्यासाठी मदत होईल, अशी अपेक्षा आहे. शेतकऱ्यांना थोडीफार मदत झाली असली तरी प्रत्यक्षातील नुकसान आणि कुटुंबांना झालेल्या वेदना पाहता ते मुळापासून समजून घेण्याची को्..ीही तयारी दिसत नाही. एकप्रकारे नैसर्गिक संकट हे आता शेतकऱ्यांच्या आयुष्यातील भागच बनला आहे की काय? असे म्हणावे लागत आहे. एक समस्या संपत नाही तोच दुसरी समस्या उभी राहताना दिसते.

गेल्या वर्षी वर्ल्ड वेदर एट्रिब्युशन (डब्लूडब्लूए) आणि क्लायमेंट सेंट्रलचा संयुक्त अहवाल जारी झाला. त्यांच्या मते, मानवी हस्तक्षेपामुळे हवामान बदलाला चालना मिळत असून त्याचा परिणाम वातारणावर होत आहे. या कारणामुळे २०२४ मध्ये जगातील अनेक भागांना चक्रीवादळ, महापूर, दुष्काळ, जंगलातील वणवा आणि उष्णतेच्या लाटा सहन कराव्या लागल्या. सुमारे २४ नैसर्गिक आपत्तीत ३७०० जणांचा मृत्यू झाला आणि लाखो लोक बेघर झाले. या अहवालावरुन हवामान बदलाचे गंभीर परिणाम लक्षात येतात. यावर्षी पाऊस, ढगफुटी व महापुराने झालेले नुकसान पाहता त्याचे अजूनही सरकारी पातळीवर सर्वेक्षण सुरू असून त्यासंदर्भात अंदाज बांधले जात आहेत. खाद्य आणि कृषी संस्था (एफएओ) यांच्या अहवालानुसार, वाढत्या नैसगिक घटनांमुळे जगभरातील शेतकऱ्यांवर दरवर्षी आर्थिक, शारीरिक, मानसिक आणि सामाजिक परिणाम होत आहे. ते अनेक आजारांना बळी पडत आहेत. हा फटका शेतकऱ्यांना एकप्रकारे उद्ध्वस्त करण्याच्या स्थितीत उभे करण्यास प्रवृत्त करत आहे. शेतकऱ्यांचे नुकसान हे जागतिक पातळीवरील कृषी क्षेत्राच्या वार्षिक जीडीपीच्या सुमारे पाच टक्के एवढे आहे. नैसर्गिक संकटांच्या घटनांत गेल्या तीस वर्षांत प्रचंड वाढ झाली असून ती बाब चिंताजनक आहे. ऋतुचक्रातील बदल हा अनेक प्रकारच्या समस्या, संकट, अडचणी आणि आजारपणाला निमंत्रण देत आहेत. शास्त्रज्ञांच्या मते, हवामान बदलाच्या नैसर्गिक कारणामुळे जगभरात अनेक समस्या, आजारपण, संकट आणि ऋतूचक्र याविषयी व्यक्त केलेल्या अंदाजापेक्षा अधिक बदल पाहवयास मिळत आहे.

हवामान बदलाला चालना देणाऱ्या घटकांचे आकलन केल्यास हवेतील प्रदूषण, सूर्यात बदल, ज्वालामुखीचे उत्सर्जन, कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वाढणे, जीवाश्म इंधनाचा अधिक वापर, जंगलतोड, डोंगर फोडणे, औद्योगिक क्षेत्रातून विषाक्त कचरा बाहेर फेकणे, शेतीच्या बदलत्या पद्धतीवरून ग्रीनहाऊस गॅसमध्ये होणारी वाढ आणि वाहनांची वाढती संख्या या गोष्टींचा उल्लेख करता येईल. याव्यतिरिक्त सततच्या सैनिकी संघर्षामुळे वातावरणात पसरणारा विषारी गॅस, अण्विक कचरा, प्लॅस्टिक आणि मायक्रोप्लास्टिक देखील ऋतुचक्र आणि हवमानाला अडचणीत आणत आहे. शास्त्रज्ञांच्या मते, कार्बन डायऑक्साईड आणि मिथेन ग्रीन हाऊस गॅस या कारणामुळे ग्लोबल वार्मिंगची समस्या सतत वाढत आहे.

हवामान बदलाच्या काळात होणाऱ्या नैसर्गिक संकटांमुळे होणारी मनुष्य अणि वित्तहानी तसेच शेत-बागायतीचे होणाऱ्या नुकसानीला जबाबदार कोण? असा प्रश्न निर्माण होत आहे. एवढेच नाही तर शेतकऱ्यांवर अन्नधान्य, फळे भाजीपाला आणि दूध उत्पादनाची देखील जबाबदारी असून याखाली दबलेल्या शेतकऱ्यांची शोचनिय स्थिती आणखी किती दिवस राहणार? अशीही विचारणा होते. सरकारच्या मदतीने शेतकऱ्यांना नुकसानीची भरपाई होते का? भारतात तर होत नाही. एकप्रकारे हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम शेतकऱ्यांवर झाला आहे. कृषी क्षेत्रातील शेतकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे.

‘एफओ’चे आकडे पाहिले तर गेल्या २३ वर्षात शेतकरी आणि शेतमजुरांची संख्या ४० हून २६ टक्क्यांवर आली आहे. एका आकडेवारीनुसार, २००० मध्ये सुमारे १०२.७ कोटी नागरिक म्हणजेच जागतिक श्रमशक्तीच्या सुमारे ४० टक्के वाटा कृषीक्षेत्र उचलत असताना तो २०२१ मध्ये २६ टक्क्यांवर आला आहे. म्हणजे केवळ ८७.३ कोटी पेक्षा कमी नागरिकांची उपजिविका कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. भारतात गेल्या काही वर्षांत शेती, बागायती आणि पशुपालनातील रुची आणि रोजगाराचे अवलंबित्व सातत्याने कमी होत आहे आणि भारतासारख्या कृषीप्रधान देशाला ही बाब परवडणारी नाही.

खाद्य आणि कृषी संघटनेचे नवे ‘स्टॅटिस्टिकल इअर बुक: वर्ल्ड फूड अँड ॲग्रीकल्चर २०२३’ च्या मते, १९९१ पासून २०२१ या काळात शेतकऱ्यांना महापूर, चक्रीवादळ, ओला दुष्काळ, ढगफुटी यासारख्या घटनांना सातत्याने सामोरे जावे लागले असून पीक आणि पशुधनाच्या नुकसानीपोटी सुमारे ३२१.६ लाख कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागले आहे. हा खर तर मोठा फटका आहे. २०२१ पासून २०२५ च्या ऑगस्ट महिन्यांपर्यंत सुमारे २०० कोटी रुपयांच्या नुकसानीचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. एवढे मोठे नुकसान अन्य क्षेत्रात क्वचितच दिसले असेल. अर्थात काहीवेळा नुकसान झाले असेल तर संबंधित देशातील सरकार पीडितांच्या पाठिशी खंबीरपणे उभी राहते. त्यामुळे संबंधित देशात कृषी क्षेत्र हा तोट्याचा व्यवहार ठरत नाही. साहजिकच गावातून स्थलांतरितांचे प्रमाण तेथे असून नसल्यासारखे आहे. कृषी क्षेत्राशिवाय अन्य क्षेत्रातही काम करणाऱ्या व्यक्तींचे नुकसान झाल्यास सरकारकडून संपूर्ण भरपाई दिली जाते. भारतात मात्र वेगळेच चित्र पाहवयास मिळते. शेतकऱ्यांना नुकसान भरपाईच्या नावावर गाजर दाखविले जाते. स्वातंत्र्याच्या ७७ वर्षांत शेती व्यवसाय हा सर्वात नुकसानीचे क्षेत्र म्हणून राहिले असून शेती आणि शेतमजुरांची स्थिती सर्वात दयनीय राहिली आहे.

सातत्याच्या नैसर्गिक संकटामुळे आणि सरकारकडून समाधानकारक मदत मिळत नसल्याने कृषी क्षेत्र हा अधिक त्रासदायक क्षेत्र ठरत आहे. शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण सर्वात गंभीर असून त्यांचे कुटुंबीयही वाऱ्यावर पडल्याचे दिसून येते. खर्च, मेहनत, अडचणी, अनिश्चतेच्या भोवऱ्यात अडकलेल्या शेतकऱ्यांच्या भाळी संकटच लिहले की काय? असे वाटू लागले आहे.

अहवालानुसार, भारतासह आशियातील शेतकऱ्यांना गेल्या तीन दशकांत सुमारे १४३.२ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले. म्हणजे अमेरिका आणि युरोपातील कृषी क्षेत्राच्या तुलनेत आशियातील शेतकऱ्यांना अधिक नुकसान सहन करावे लागले आहे. भारतातील लाखो शेतकरी अनेक आर्थिक आघाड्यांवर कसरत करत असताना कौटुबिक समस्येतही अडकलेले दिसून येतात. शेती करण्याची इच्छा कमी होत असताना सरकारकडून मात्र यादृष्टीने कोणतेही पाऊल उचलताना दिसत नाही. कृषी क्षेत्राकडे लोकांनी अधिकाधिक यावे आणि बेरोजगारीचे प्रमाण कमी होईल, यादृष्टीने धोरण आखलेले दिसत नाहीत. कृषी क्षेत्रात अचानक उद्भवणारा खर्च हा शेतकऱ्यांसाठी चिंतेचा मुद्दा आंहे. त्यामुळे सरकारने तज्ज्ञांचा सल्ला घेत शेतकऱ्यांच्या अडचणी कमी करणारे धोरण आणण्याबाबत काम करायला हव.

**■ नवनाथ वारे,** कृषी अभ्यासक

# माता-भगिनींना साडी व फराळ वाटप करून बजरंग दलाची भाऊबीज साजरी

**नायक वृत्तसेवा, लोणी**

दरवर्षी प्रमाणे उत्साहाने साजरी होणारी दिवाळी लोणी खुर्द सेवा वस्ती येथे बजरंग दलाच्या वतीने उत्साहाने साजरी करण्यात आली. लोणी खुर्द मधील सेवा वस्ती येथील गोरगरीब, अनाथ व गरजू नागरिकांना याही वर्षी भाऊबीज निमित्ताने माता-बहीणींना साडी व मिठाई, फराळ वाटप करून दिवाळीचा आनंद साजरा करण्यात आला.

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या चेहऱ्यावर आनंदाची झळाळी आणण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. विश्व हिंदू परिषद, बजरंग दल लोणी शहर अध्यक्ष सागर राक्षे यांच्या मार्फत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सर्वांची दिवाळी मोठ्या संख्येने व आनंदाने आपापल्या घरात साजरी होत असते परंतु गोरगरीबांकडे कोणाचे लक्ष जात नाही, म्हणून बजरंग दल नेहमी सामाजिक उपक्रम करत इतरांना प्रोत्साहन देत असते.

यावेळी बजरंग दलाचे जिल्हा सुरक्षा, प्रचार- प्रसार प्रमुख प्रसाद घोगरे, विठ्ठल ठोंबरे, राधाकिसन आहेर, विकी राक्षे, विलास ससाणे, अमन शेख, विशाल आव्हाड, वैभव शेलार, बाळू सातपुते, रोहीत पवार, दिपक पवार, मनोज साळवे, शुभम साळवे, गणेश साळवे, अभिषेक विर, अजय पवार, संकेत तांबे, राहुल धोत्रे, कृष्णा वाघ, अल्ताफ शेख, जलील शेख, ओमकार घोरपडे, भगत, सागर उबाळे, हिना उबाळे, जयप्रकाश खंडेलवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमास विश्व हिंदू परिषदेचे जिल्हामंत्री विशाल वाकचौरे, जिल्हा संयोजक शुभम मुर्तडक यांचे मार्गदर्शन लाभले. या उपक्रमात साडी व फराळ वाटप करण्यात आले. त्यावेळी परिसरातील महिलांनी आणि नागरिकांनी समाधान व्यक्त केले. बजरंग दलाच्या वतीने राबविलेल्या या उपक्रमातून समाजातील एकतेचा, सेवाभावाचा आणि बांधिलकीचा उत्तम संदेश देण्यात आला आहे.



# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीचा भगवा फडकविण्याचा संकल्प करा : ना. विखे

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

तालुक्यातील जनतेने मागील दिवाळीला आ. अमोल खताळ यांना विजयी करून महायुतीला मोठी भेट दिली होती. या वेळची भेट म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीचा भगवा फडकवण्याचा संकल्प करा असे आवाहन जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

आमदार अमोल खताळ आणि महायुतीच्या वतीने दिपावली स्नेहमिलन आणि दिवाळी फराळ कार्यक्रमाचे मालपाणी लॉन्स येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री विखे पाटील बोलत होते.यावेळी आ. अमोल




खताळ, प्रा. एस. झेड देशमुख, भाजपचे प्रदेश पदाधिकारी सुनील कर्जतकर, शिवसेनेचे जालिंदर भोर, जिल्हाप्रमुख कमलाकर कोते, उपजिल्हाप्रमुख मारुती मेंगाळ, जिल्हा संघटक विठ्ठल घोरपडे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार, शिवसेनेचे तालुकाप्रमुख रामभाऊ राहणे, राजेंद्र सोनवणे, शहर प्रमुख दिनेश फटांगरे, विनोद सूर्यवंशी, सुदाम सानप, बापूसाहेब गुळवे, भीमराज चतर, डॉ. अशोक इथापे, श्रीराम गणपुले, जावेद जहागिरदार, भाजपच्या शहराध्यक्षा पायल ताजणे, रोहित चौधरी, डॉ. सोमनाथ कानवडे, कैलास वाकचौरे, आशिष शेळके, कैलास कासार, शौकत जहागीरदार, हरीश चकोर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

■ जिल्हा बँकेचे चेअरमन आ. शिवाजी कर्डिले आणि संगमनेर तालुक्यातील पठार भागातील साकुरचे भाजपाचे पदाधिकारी बुवाजी खेमनर यांच्या निधनामुळे या स्नेह मिलन कार्यक्रमात मंत्री विखे पाटील यांनी सत्कार न स्विकारता आ. कर्डिले व खेमनर यांना श्रद्धांजली वाहिली.

मंत्री विखे पाटील म्हणाले की, आमच्या निवडणुका झाल्या आता कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिकेच्या निवडणुकीत गट तट बाजूला ठेवून महायुती जो उमेदवार देईल त्याच्या पाठीमागे उभे राहण्याचे आवाहन करून तालुक्यामध्ये शत प्रतिशत महायुतीला विजयी करण्याचा संकल्प करून निर्धार करण्याचे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले. यावेळी मंत्री विखे पाटील यांनी संगमनेरी मिसळ आणि जिलेबीचा आस्वाद घेतला तसेच शहर आणि तालुक्यातील दहा ते बारा हजार संगमनेरकरांनी मिसळीचा आस्वाद घेतला.

स्वागत आ. अमोल खताळ यांनी केले. सूत्रसंचालन स्मिता गुणे यांनी करून उपस्थितांचे आभार मानले. यावेळी संगमनेर शहर आणि तालुक्यातील महायुतीचे कार्यकर्ते आणि संगमनेरकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने उकिर्डे सन्मानित

**नायक वृत्तसेवा, राजुर**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक महामंडळ मुंबई यांच्यावतीने देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने संजय उकिर्डे यांना नुकतेच गौरवण्यात आले.

संजय उकिर्डे हे सध्या अकोले तालुक्यातील पांजरे येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. संजय उकिर्डे यांचे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक महामंडळाचे उपाध्यक्ष सुनिल पंडीत,




अहिल्यानगर माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे कार्याध्यक्ष राजेंद्र सोनवणे,आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, मुख्याध्यापक महामंडळाचे अध्यक्ष तानाजी माने, माजी अध्यक्ष सुभाष माने, सुनिल भोर, के. डी. आभाळे यांनी अभिनंदन केले आहे.

पान १ वरुन

**रक्तदाब वाढवणाऱ्या इंजेक्शनची संगमनेरात बेकायदा विक्री!**

फोन केला, मात्र महिन्याच्या विशिष्ट तारखांनाच सक्रिय असलेल्या या विभागाशी कोणताही संपर्क न झाल्याने अखेर त्यांनी पोलीस कॉन्स्टेबल खुळे व क्षीरसागर यांच्यासह मिळालेल्या माहितीप्रमाणे नगरपालिकेजवळील शास्त्री चौकात असलेल्या 'एम.आर.व्हिटॅमीन सप्लिमेंट शॉप' या ठिकाणी सापळा लावून बनावट ग्राहक पाठवले.

दुपारी साडेतीनच्या सुमारास घडत असलेल्या या प्रकारात बनावट ग्राहकाने शॉपमध्ये जावून 'मेफेनटर्माइन सल्फेट' औषधाची मागणी करताच दुकानदाराने त्याची पूर्तता केली. हा व्यवहार पूर्ण होताच गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने छापा घालीत आदित्य किशोर गुप्ता (वय २४, रा.साईनगर, संगमनेर) याला ताब्यात घेत त्याच्याकडून डॉक्टरांच्या अधिकृत चिठ्ठीशिवाय विक्री करण्यास कठोर मनाई असलेल्या 'मेफेनटर्माइन सल्फेट' इंजेक्शनच्या प्रत्येकी दहा मिलीच्या तीन बाटल्या, नऊ सिरींज, यामाहा कंपनीची दुचाकी (क्र.एम.एच.१५/एच.पी.६६४६) आणि १६ हजार २५० रुपयांची रोकड असा एकूण दोन लाख २३ हजार १२० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल बाबासाहेब सातपुते यांनी दिलेल्या तक्रारीवरुन शहर पोलिसांनी एम.आर.व्हिटॅमीन सप्लिमेंट शॉपचा चालक आदित्य किशोर गुप्ता (वय २४, रा.साईनगर) याच्या विरोधात भारतीय न्यायसंहितेच्या कलम १२३, १२५, २७८ प्रमाणे गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे. आज (ता.२८) दुपारी त्याला न्यायालयासमोर हजर केले जाणार आहे. बीएनएसच्या कलम १२३ प्रमाणे एखाद्या व्यक्तिला दुखापत पोहोचवण्याच्या हेतूने किंवा कोणताही गुन्हा करण्यासाठी, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सुविधा देण्याच्या हेतूने किंवा त्यामुळे दुखापत होण्याची शक्यता आहे हे माहिती असतानाही त्या व्यक्तिला विष, अंमली पदार्थ, नशा आणणारे किंवा अपायकारक औषध विक्री अथवा पुरवठा केल्यास दहा वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा होवू शकते.

'मेफेनटर्माइन सल्फेट इंजेक्शन'चा वापर हृदय अथवा रक्तदाबाच्या संबंधी उपचारादरम्यानच केला जातो. विशेषता ज्या रुग्णांचा रक्तदाब कमी आहे, त्यांचा रक्तदाब वाढवण्यासाठी त्याचा वापर होतो. औषध आणि सौंदर्य प्रसाधने कायद्यान्वये सदरचे औषध शेड्यूल 'एच' श्रेणीत मोडते. त्यामुळे त्याचे उत्पादन, साठवणूक व वाहतुकीसह तज्ञ डॉक्टरांच्या अधिकृत चिठ्ठीशिवाय त्याची विक्री करण्यास कठोर नियम आहेत. त्याचे उल्लंघन केल्यास कठोर शिक्षेचेही प्रावधान करण्यात आलेले आहे. राज्यात या कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी अन्न आणि औषध प्रशासनाची आहे.

डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय आधुनिक जिममध्ये अथवा शरीरसौष्ठवाच्या क्षेत्रात मेहनत घेणाऱ्यांना प्रोटीन्स पुरवठा करणाऱ्या दुकानांमध्ये अवैधपणे या औषधाची विक्री करणाऱ्यांवर या विभागाने पोलिसांच्या मदतीने संयुक्त कारवाई करण्याची गरज आहे. मात्र जिल्ह्यातील हा विभाग मनुष्यबळाचे कारण देत प्रत्येक महिन्याच्या विशिष्ट तारखांनाच सक्रिय होत असल्याने मानवी शरीरावर घातक परिणाम करणाऱ्या अशा औषधांची जिल्ह्यातील बहुतेक सर्वच तालुक्यात सर्रास विक्री होत असल्याचेही शहर पोलिसांच्या या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

मेफेनटर्माइन सल्फेट उत्तेजक औषध असल्याने व्यायाम करणारे तरुण, पहेलवान अथवा शरीरसौष्ठव करणारे तरुण शारीरिक क्षमता वाढवण्यासाठी आणि त्यातून जलदगतीने स्नायू ताणण्यासाठी त्याचा वापर करतात. हे एक प्रकारचे सिम्पॅथोमिमेटिक औषध आहे, ज्याच्या सेवनाने शरीराच्या 'लढा किंवा पळा' प्रणालीवर परिणाम होतो. या औषधाच्या नियमित सेवनाने आरोग्यावर घातक परिणाम होवू शकतो. अचानक रक्तदाब वाढत असल्याने हृदयाची गती वाढून हृदविकाराचा अधिक धोका असतो. अचानक उत्तेजना वाढत असल्याने मज्जासंस्थेवरही त्याचा विपरित परिणाम होतो. त्यातून चिंता, नैराश्य, अस्वस्थता, अनिद्रा, डोकेदुखी, शारीरिक कंप आणि चिडचीड या सारख्या व्याधी जडू शकतात. त्यामुळेच डॉक्टरांच्या अधिकृत चिठ्ठीशिवाय सदरचे औषध विकण्यास मनाई आहे.

**तब्बल दोन किलो सोन्यासह सहा कारागीर फरार!**

नावाचे दुकान सराफ बाजारात असून, त्यांच्या तळमजल्यावर हे कारागीर दागिने बनवण्याचे काम करत होते. तसेच दोन कारागीर सोमनाथ सामंता आणि आन्मेश दुलोई हे शेजारील सोनार विजय जगदाळे यांच्या दुकानात कार्यरत होते.रविवारी (२६ ऑक्टोबर) सायंकाळी साडेसातच्या सुमारास फिर्यादी कृष्णा देडगावकर तळमजल्यावर गेले असता, कारागीर दिपनकर माजी गायब असल्याचे दिसून आले. संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्याने दहा मिनिटांत येतो असे सांगितले, मात्र त्यानंतर त्याचा मोबाईल बंद झाला. त्याचवेळी इतर कारागीरांचे मोबाईलही बंद लागल्याने संशय अधिक गडद झाला.पुढील चौकशीत हे सर्व कारागीर आपल्या निवासस्थानी नसल्याचे, घरे कुलूपबंद असल्याचे आढळले. अखेर खात्री पटली की त्यांनी सोन्याचे दागिने घेऊन पलायन केले आहे.

या प्रकरणात एकूण २ किलो २१ ग्रॅम सोने व दागिने चोरीस गेले असून, त्याची किंमत तब्बल १ कोटी १ लाख ५ हजार रुपये इतकी आहे. चोरी गेलेल्या सोन्यात कृष्णा देडगावकर, प्रतीक देडगावकर, विजय जगदाळे, सागर गुरव, भरत शिराळकर, बरजहान शेख, प्रमोद गाडगे, आणि इम्रान अली या सोनारांचा समावेश आहे.

सदर कारागीरांनी गेल्या काही महिन्यांत सोनारांचा विश्वास संपादन करून लबाडीने ही चोरी केल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. त्यांच्या पत्त्यांची स्पष्ट माहिती नसल्याने पोलिसांना तपासात अडचण येत असून आरोपी पकडण्याचे मोठे आव्हान कोतवाली पोलिसांपुढे उभे ठाकले आहे.

**सोनसाखळी चोराला पोलीसांनी केले जेरबंद!**

गणेश विजय साळी यांच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाची ७५ हजार रुपये किंमतीची सोन्याची चैन चोरून नेली होती. या प्रकरणी कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये गु.र. नं. ९७६/२०२५ अंतर्गत बीएनएस कलम ३०३ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला.सखोल चौकशीतून एकनाथ महादेव मासाळकर (वय ४५, रा. नाथनगर,पाथर्डी) हा संशयित आढळून आला. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली.आरोपीची अंगझडती घेतली असता चोरी गेलेला एकूण दीड लाखांचा सोन्याचा माल हस्तगत करण्यात आला.या यशस्वी कारवाईत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील पथकाने कार्यवाही केली.या पथकात पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख, पो. हे. कॉ. दौड, वसिम पठाण, शाबीर शेख, विशाल दळवी, विनोद बोरगे, पो. ना. वाघचौरे, दीपक रोहकले, सत्यम शिंदे, अभय कदम, अमोल गाढे, सचिन लोळगे, सुरज कदम, दत्तात्रय कोतकर, शिरीष तरटे, अतुल काजळे, राम हंडाळ यांनी सहभाग घेतला. पुढील तपास पो. हे. कॉ. औटी करीत आहेत.

# कॉंग्रेसच्या तालुका उपाध्यक्षपदी लक्ष्मण कुदनर यांची निवड



**नायक वृत्तसेवा, साकुर**

संगमनेर तालुक्यात कॉंग्रेस पक्षाचे संघटन अधिक बळकट करण्यासाठी माजी मंत्री बाळासाहेब थोरात व संगमनेर तालुका युवक कॉंग्रेसच्या तालुकाध्यक्षा डॉ. जयश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आउटरिच युवक कॉंग्रेसची संगमनेर तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.

या कार्यकारिणीत शिंदोडी येथील लक्ष्मण उत्तम कुदनर यांना स्थान देण्यात आले असून त्यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली एकनिष्ठपणाने लक्ष्मण कुदनर यांनी पठार भागात काम केले असल्याने त्यांच्यावर उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

या निवडीबद्दल लक्ष्मण कुदनर यांचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आ. डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गा तांबे, संगमनेर तालुका युवक कॉंग्रेसच्या तालुकाध्यक्षा डॉ. जयश्री थोरात, संगमनेर तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष अजय फटांगरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शंकर खेमनर, महिला व बालकल्याण समितीच्या माजी सभापती मिरा शेटे, थोरात कारखान्याचे संचालक इंद्रजीत खेमनर, रामदास धुळगंड, भगवान उद्योग समूहाचे संस्थापक आदिक खेमनर, बालाजी उद्योग समूहाचे संस्थापक बाबासाहेब भोसले, चेअरमन रेवजी धुळगंड यांनी अभिनंदन केले आहे.

यावेळी आउटरीच तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष डॉ. विजय पवार, ॲड. अशोक हजारे, सचिन खेमनर, उत्तम कुदनर, पोपट कुदनर, बाबूलाल शेख, सखाराम कुदनर, दादासाहेब बागुल, संजय खामकर, बाबासाहेब कुदनर, सोपान कुदनर, आप्पासाहेब कुदनर उपस्थित होते.

KUTE HOSPITAL and LAPROSCOPY CENTRE
Staff recruitment
Nursing Staff - Morning , Evening, Night. Male/ Female
Qualification- BSc Nursing , GNM
Sister in charge - BSc Nursing / MBA
Reception- Male and Female
RMO doctors- Morning Evening Night
Ward manager- 1
MJPJAY Data entry operator
Claim Doctor - MJPJAY/ Mediclaim
--Address--
40 Feet D.P. Road,
Tajane Mala,
Navin Nagar Road,
Sangamner
Phone: (02425) 226688, 226686/
888 888 2225

जाहिरात छोटी.....
प्रतिसाद मोठा.

सेल्समन पाहिजेत
जेन्ट्स सेल्समन - 2 जागा
लेडीज सेल्समन - 3 जागा
कॉम्प्युटर ऑपरेटर- 2 जागा
सारिका ड्रेसेस
बाजारपेठ, संगमनेर
9822358335

छोट्या जाहिरातीचे दर
रू.300/-
3+1 (4) दिवस
शब्द मर्यादा 40 फक्त

जाहिरातीसाठी संपर्क-सचिन
9767007746







'बांधिलकी जनहिताची नायक' हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटींग ॲण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टॅंडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

# दोन मजली घर, पण रुंदी फक्त ५२ इंच



सध्या सोशल मीडियावर ५२ इंच रुंदीच्या एका दोन मजली घराचा व्हिडीओ खूप चर्चेत आहे. '५२ इंच हाऊस' असे नावच असलेल्या या अनोख्या घराच्या होम टूरचा व्हिडीओ बिहारमधील एका कंटेंट क्रिएटर आदित्यने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंट ऽरवळीृरीशीळशी०१ वर शेअर केला आहे. हा व्हिडीओ पाहून नेटकरी थक्क झाले आहेत. लोक हे पाहून आश्चर्यचकित झाले आहेत की इतक्या कमी जागेतही घरातील सर्व सुख-सुविधा आहेत.

व्हायरल होत असलेल्या या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता की घर इतके अरुंद आहे की दरवाजा उघडताच कंटेंट क्रिएटर आपले हातही नीट पसरू शकत नाही. पण, इतक्या लहान घरातही सर्व आवश्यक वस्तू आहेत. व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये तुम्हाला दिसेल की आत जाताच समोर एक लहानसे देवघर आहे. त्याच्या शेजारीच तीन फूट रुंद बेड आहे. त्यानंतर एक व्यवस्थित स्वयंपाकघर आहे, ज्यात प्रत्येक गोष्टीसाठी शेल्फ बनवलेली आहे आणि भांडी भिंतीवर योग्य पद्धतीने लावून ठेवली आहेत. या घरात वॉशरूम आणि बाथरूम वेगळे आहेत.

सर्वात खास गोष्ट ही आहे की या दोन मजली घरात वर जाण्यासाठी जीने देखील बनवलेले आहेत. मात्र, त्या इतक्या अरुंद आहेत की एका वेळी फक्त एकच व्यक्ती वर किंवा खाली जाऊ शकते. कंटेंट क्रिएटरनुसार, हे घर ५० फूट लांब आणि ४ फूट ४ इंच रुंद आहे. दोन दिवसांत या व्हिडीओला १ कोटीपेक्षा जास्तवेळा पाहिला गेला आहे. त्यामुळे हा व्हिडीओ किती लोकप्रिय झाला आहे याचा अंदाज लावता येऊ शकतो. तसेच व्हिडीओला १ लाख ७७ हजारपेक्षा जास्त लोकांनी लाइक केले आहे. व्हिडीओ पाहिल्यानंतर नेटिझन्स विविध प्रकारच्या प्रतिक्रिया देत आहेत. एका युजरने लिहिले की, ङ्गमला तर पाहताच श्वास घेणे कठीण झाले. व्हेंटिलेशनसुद्धा नाही. मी तिथे राहण्याची कल्पनाही करू शकत नाही.'दुसऱ्या युजरने म्हटले, जसेही आहे, पण आपले तरी आहे.' एका युजरने मजेशीर पद्धतीने लिहिले, 'सर्वकाही आहे, पण ऑक्सिजनची कमतरता आहे.' तर, आणखी एका युजरने हृदयस्पर्शी कमेंट केले, 'गरीब माणसाचे स्वतःचे घर बनले तरी ते मोठी गोष्ट आहे. ते किती मोठे किंवा किती लहान आहे, याचा काही फरक पडत नाही.'

# लॉस एंजेलिसमध्ये उडती तबकडी?



अमेरिकेत लॉस एंजेलिसच्या आकाशात एका अज्ञात उडत्या वस्तूचे (युफो) स्पष्ट आणि आश्चर्यकारक फोटो समोर आले आहेत, ज्यामुळे अमेरिकेच्या मोठ्या शहरांवर काय उडत आहे याबद्दल पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. लॉस एंजेलिसमधील दोन रहिवासी त्यांच्या बाल्कनीतून शहराकडे पाहत असताना, त्यांना एक काळ्या रंगाची, 'V' आकाराची, दिव्यांनी भरलेली वस्तू हळू हळू उडताना दिसली.

हे दृश्य सुमारे २५ मिनिटे चालू होते. ही UFO दक्षिणेकडे उडत होती आणि रात्री ११.३८ वाजता (स्थानिक वेळेनुसार) दिसेनाशी झाली. या दोन्ही साक्षीदारांनी त्यांच्या मोबाईल फोनच्या कॅमेऱ्यातून स्पष्ट फोटो आणि व्हिडीओ काढले. व्हिडीओमध्ये झूम केल्यावर, त्या 'युफो' च्या पृष्ठभागावर नऊ पांढरे दिवे स्पष्टपणे दिसले. या स्पष्ट दृश्यांमुळे, अमेरिकेच्या मोठ्या शहरांच्या आकाशात उडणाऱ्या वस्तूंबद्दल पुन्हा एकदा वाद सुरू झाला आहे.

युफो संशोधक आणि चित्रपट निर्माता मार्क क्रिस्टोफर ली यांनी सांगितले की, त्यांचा विश्वास आहे की ती वस्तू परग्रहावरील नाही. ते म्हणाले, 'ती अमेरिकेच्या सरकारसाठी किंवा इतर कोणत्याही जागतिक महाशक्तीसाठी नवीन तंत्रज्ञानाची चाचणी करणारी एक मानवरहित ड्रोन असण्याची शक्यता आहे. मात्र, या दृश्याच्या आणि ब्रिटनमधील अनेक प्रसिद्ध यूफो घटनांच्या त्यांच्या विश्लेषणानंतर ली यांनी एक धक्कादायक दावा केला आहे.

ते म्हणाले की, 'अमेरिकेच्या लष्कराने असे तंत्रज्ञान विकसित केले आहे, जे २०२५ मध्येही फक्त विज्ञान कल्पनेमध्ये असल्याचे लोकांना वाटते.' ली यांनी स्पष्ट केले, 'माझा असा विश्वास आहे की, अनेक प्रसिद्ध युफो घटनांमध्ये वापरलेले तंत्रज्ञान हे अत्यंत प्रगत आहे, जे आपल्या कल्पनेपेक्षा ३० ते ४० वर्षे पुढे आहे.' ती वस्तू कुठून आली, हे महत्त्वाचे नसले तरी, गेल्या काही महिन्यांपासून अमेरिकेच्या आकाशात 'त' आकाराच्या किंवा शेवरॉन (chevron) आकाराच्या वस्तू उडताना दिसल्याच्या अनेक घटनांपैकी ही सर्वात ताजी घटना आहे.






# विषारी वातावरणात जगणारी आळी

खोल समुद्रातील उष्ण जलस्रोताजवळ राहणाऱ्या एका अळीच्या प्रजातीने जगण्यासाठी एक आश्चर्यकारक युक्ती विकसित केली आहे. ही अळी आर्सेनिक आणि सल्फाईड या दोन अत्यंत विषारी पदार्थांना आपल्या पेशींमध्ये एकत्र करून एक कमी हानिकारक खनिज तयार करते. या अनोख्या शोधाबद्दलची माहिती चीनच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ ओशनॉलॉजी, सीएएस' येथील चाओलुंग ली आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'पीएलओएस बायोलॉजी' या खुल्या संशोधन पत्रिकेमध्ये प्रसिद्ध केली आहे.'पॅरल्व्हिनेला हेस्लेरी' नावाची ही प्रजाती पश्चिम पॅसिफिक महासागरातील उष्ण जलस्रोताच्या सर्वात गरम भागांमध्ये राहू शकणारा एकमेव जीव आहे. या स्रोतांमधून बाहेर पडणाऱ्या गरम, खनिज-समृद्ध पाण्यात मोठ्या प्रमाणात सल्फाईड आणि आर्सेनिक असते. या अळीच्या शरीरात आर्सेनिक जमा होत जाते, काही प्रकरणांमध्ये ते तिच्या एकूण वजनाच्या १% पेक्षा जास्त असते. 'पी. हेस्लेरी' या विषारी वातावरणात कशी जगते, हे शोधण्यासाठी ली यांच्या टीमने प्रगत सूक्ष्मदर्शकाचा वापर केला. त्याचबरोबर डीएनए, प्रोटिन आणि रासायनिक विश्लेषणही केले. त्यांच्या संशोधनातून एक पूर्णपणे नवीन विषारीकरण प्रक्रिया उघड झाली. ही अळी आर्सेनिकचे कण आपल्या त्वचेच्या पेशींमध्ये साठवते, जिथे ते उष्ण जल स्रोतातील सल्फाईडसोबत मिसळून 'ऑर्पिमेंट' नावाचे चमकदार पिवळ्या रंगाचे खनिज तयार करतात. संशोधकांनी या असामान्य प्रक्रियेला 'विषाशी लढण्यासाठी विषाचाच वापर' असे वर्णन केले आहे. ही युक्ती त्या अळीला अशा वातावरणात जगू देते, जिथे इतर कोणत्याही प्राण्यासाठी जगणे शक्य नाही. इतर काही अभ्यासांमधून असेही सूचित होते की पश्चिम पॅसिफिकमधील काही संबंधित अळी प्रजाती आणि काही गोगलगायींमध्येही मोठ्या प्रमाणात आर्सेनिक जमा होते आणि त्यादेखील अशाच प्रकारच्या पद्धतीचा वापर करत असतील.

सहलेखक डॉ. हाओ वांग म्हणाले, 'हा माझा पहिला खोल समुद्रातील शोध मोहीम अनुभव होता. आर.ओ.व्ही. मॉनिटरवर मी जे काही पाहिले, ते पाहून मी थक्क झालो. चमकदार पिवळ्या रंगाच्या 'पॅरल्व्हिनेला हेस्लेरी' अळ्या मी यापूर्वी पाहिलेल्या कोणत्याही प्राण्यांपेक्षा वेगळ्या होत्या आणि पांढऱ्या बायोफिल्म व गडद उष्ण जलस्रोताच्या पार्श्वभूमीवर त्या उठून दिसत होत्या. अशा अत्यंत विषारी वातावरणात कोणताही प्राणी जगू शकतो, यावर विश्वास ठेवणे कठीण होते.'

# पिरॅमिडमध्ये बूबी ट्रॅप्स

प्राचीन इजिप्शियन लोकांनी पिरॅमिड सुरक्षित ठेवण्यासाठी अनेक उपाय केले होते. पण, त्यांनी कधी सापळे किंवा 'बूबी ट्रॅप्स' वापरले होते का? इजिप्तॉलॉजिस्ट (इजिप्तशास्त्राचे अभ्यासक) सांगतात की, या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असे आहे. इजिप्तॉलॉजिस्ट रेग क्लार्क म्हणाले, 'नाही, त्यांनी पिरॅमिडमध्ये सापळे




वापरले नाहीत; पण त्यांनी आत जाणे खूपच कठीण केले होते!'

प्राचीन इजिप्शियन थडग्यांच्या सुरक्षिततेवर विस्तृत लेखन करणाऱ्या क्लार्क यांनी सांगितले की, पिरॅमिडमध्ये सापळ्यांची कल्पना कुठून आली, हे स्पष्ट नाही. 'इंडियाना जोन्स' आणि 'टॉम्ब रायडर' यांसारख्या चित्रपट आणि व्हिडीओ गेम्समध्ये असे सापळे दाखवले गेले आहेत. परंतु, प्राचीन इजिप्शियन लोकांनी खोट्या जमिनीखालील खिळ्यांचे खड्डे किंवा एखाद्याला उलटे लटकवणारे फासे असे सापळे वापरल्याचे दिसत नाही.

पिरॅमिडवर विस्तृत लेखन करणारे इजिप्तॉलॉजिस्ट रॉल्फ क्रॉस म्हणाले, सापळ्यांविषयी इजिप्तॉलॉजिस्टना माहिती नाही. क्रॉस म्हणाले की, पिरॅमिड लुटू इच्छिणाऱ्या चोरांना थांबवण्यासाठी हे सापळे प्रभावी ठरले नसते. त्यांनी नमूद केले की, प्राचीन काळात थडगी लुटणारे चोर मोठ्या गटात काम करत असत आणि सापळा संपूर्ण गटाला अडवू शकला नसता. तुम्ही सापळ्यामध्ये एक किंवा दोन चोरांना पकडू शकता, असे क्रॉस म्हणाले; पण इतरांचे काय?

सापळा लपवण्यासाठी पुरेसा मोठा असलेला पिरॅमिड किंवा थडगं एका व्यक्तीला लुटता येत नाही; त्यासाठी एका गटाचीच गरज असते. त्यामुळे, पिरॅमिड बनवणाऱ्यांनी लोकांना त्या वास्तूंना लुटण्यापासून रोखण्यासाठी विविध स्थापत्यशास्त्राच्या पद्धती वापरल्या. क्लार्क यांनी त्यांच्या 'सिक्युअरिंग एटर्निटी : एन्शियंट इजिप्शियन टॉम्ब प्रोटेक्शन फ्रॉम प्रिहिस्टरी टू द पिरॅमिडस्' या पुस्तकात लिहिले आहे की पिरॅमिड बांधण्याचे एक कारण राजाच्या अंतिम विश्रांतीच्या ठिकाणाचे संरक्षण करणे हे होते.

पिरॅमिड बांधण्यापूर्वी, राजांना लहान 'मस्टाबा' नावाच्या थडग्यांमध्ये पुरले जात असे. या थडग्यांमध्ये शिरणे सोपे होते. याउलट, पिरॅमिडच्या आत किंवा खाली असलेल्या राजाच्या दफन कक्षापर्यंत पोहोचण्यासाठी चोरांना खूप खोलवर बोगदा खणावा लागत असे. 'पिरॅमिडच्या संरचनेतील प्रचंड वस्तुमान आणि प्रतिरोधक साहित्यामुळे आतल्या किंवा खालील व्यवस्थेला उच्च दर्जाचे संरक्षण मिळाले,' असे क्लार्क यांनी सांगितले.





# चर्चा भव्य पंख्याची

जयपुर हे आपल्या प्राचीन मंदिरांसाठी आणि समृद्ध सांस्कृतिक वारशासाठी प्रसिद्ध आहे. येथे शतकांपूर्वीच्या मंदिरांमध्ये दररोज हजारो भक्त दर्शनासाठी येतात. येथील चांदपोल बाजारातील भगवान रामचंद्र मंदिर १३० वर्ष जुने आहे. अलीकडेच या मंदिराच्या प्रांगणात २५ फूट व्यासाचा विशाल पंखा बसवण्यात आला असून तो भक्तांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू बनला आहे. हे मंदिर जयपुरमधील सर्वात जुने राम मंदिर आहे. भक्तांच्या सोयीसाठी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी हा विशाल व्यासाचा विशाल पंखा बसवला गेला. या पंख्याची हवा ५० फूट अंतरापर्यंत पोहोचते, ज्यामुळे संपूर्ण प्रांगणात गारवा जाणवतो. या पंख्याची किंमत २ लाख रुपये असून तो ५५-६० किलोमीटर प्रती तास वेगाने फिरतो. त्याचा आकार हेलीकॉप्टरच्या प्रोपेलरसारखा असल्याने तो पाहणाऱ्यांना आश्चर्यचकित करतो. हा पंखा परंपरा आणि आधुनिकतेचा अनोखा संगम असून तो जयपुरच्या सांस्कृतिक वारशाला अजून समृद्ध करतो.

# बनतंय शहराएवढे विमानतळ

संयुक्त अरब अमिरातीने एक महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे, ज्यानुसार जगातील सर्वात मोठे विमानतळ दुबईत उभारले जाणार आहे. दुबईचे शासक शेख मोहम्मद बिन राशिद अल मकतूम यांनी अलीकडेच या विशाल प्रकल्पाची घोषणा केली. अल मकतूम आंतरराष्ट्रीय विमानतळ असे या विमानतळाचे नाव असून, त्याचा विस्तार न्यूयॉर्क शहरातील मॅनहॅटन बेटाएवढा असेल.



हा प्रकल्प सुमारे ३५ अब्ज डॉलर्स (जवळपास २.९० लाख कोटी रुपये) खर्चून पूर्ण केला जाईल. एकदा पूर्ण झाल्यावर, हे विमानतळ वर्षाला सुमारे २६० दशलक्ष (२६ कोटी) प्रवाशांची वाहतूक करू शकेल. यामुळे ते जगातील सर्वाधिक प्रवासी क्षमता असलेले विमानतळ बनेल. हे विमानतळ २०५० पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यानंतर, दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथील सर्व कामकाज टप्प्याटप्प्याने नवीन विमानतळावर स्थलांतरित केले जाईल.

या विमानतळात पाच समांतर धावपट्ट्या असतील, ज्या एकाच वेळी अनेक विमानांची ये-जा सांभाळू शकतील. यामुळे प्रवाशांना जलद आणि कार्यक्षम सेवा मिळेल. याशिवाय, यात एक हजार विमानांचे पार्किंग आणि अत्याधुनिक टर्मिनल असतील. शेख मोहम्मद यांनी म्हटले आहे की, हे विमानतळ केवळ एक वाहतूक केंद्र नसून, ते एक 'शहर' असेल. या विमानतळाभोवती एक संपूर्ण नवीन शहर वसले जाईल, ज्यामध्ये ४०० हून अधिक 'ट्रॅव्हल टेक्नॉलॉजी' कंपन्या, औद्योगिक समूह आणि लक्झरी सोयीसुविधा असतील. यामुळे दुबईला जागतिक विमान वाहतुकीचे आणि लॉजिस्टिक्सचे केंद्र बनवण्याचा प्रयत्न अधिक बळकट होईल. हा प्रकल्प दुबईच्या 'भविष्यासाठी' एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. यामुळे केवळ हवाई वाहतूकच नव्हे, तर पर्यटन, व्यापार आणि रोजगार निर्मितीलाही मोठ्या प्रमाणात चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

# कॅफिनचा स्वप्नांवरही परिणाम?

काही लोक त्यांच्या कॅफिनच्या सेवनात कपात केल्यावर काही दिवसांतच त्यांना अधिक स्पष्ट स्वप्ने पडत असल्याचा अनुभव सांगतात. यामागे नक्की काय कारण आहे? तुम्ही नुकतीच कॅफिनचे सेवन कमी केले आहे आणि तुम्हाला तुमच्या आयुष्यातील सर्वात स्पष्ट स्वप्ने पडत आहेत, असे तुम्हाला वाटते का?




कॅफिन एक उत्तेजक आहे, ज्यामुळे आपल्याला सतर्क आणि जागे वाटते. हे आपल्या मेंदूतील 'एडेनोसिन' नावाच्या रसायनाला अवरोधित करून कार्य करते. जेव्हा आपण जागे आणि सक्रिय असतो, तेव्हा दिवसभर एडेनोसिन तयार होते. संध्याकाळपर्यंत, मेंदूत एडेनोसिनचा साठा झाल्यामुळे आपल्याला झोप येते. आपण झोपेत असताना एडेनोसिन साफ होते आणि आपण ताजेतवाने होऊन जागे होतो. कॅफिनचे सेवन केल्यावर ते एडेनोसिनला त्याचे सिग्नल देण्यापासून रोखते. त्यामुळे, एडेनोसिन अजूनही तिथे असले तरी, आपल्याला झोप येण्याची जाणीव तितकी तीव्र वाटत नाही. जेव्हा कॅफिनचा प्रभाव कमी होतो, तेव्हा आपल्याला झोप येण्याची इच्छा वाढते (त्याला 'कॅफिन क्रॅश' म्हणतात). कॅफिनचे अर्धायुष्य (half- life) सुमारे तीन ते सहा तास असते. याचा अर्थ, आपण सेवन केलेल्या कॅफिनपैकी निम्मे कॅफिन या वेळेनंतरही आपल्या शरीरात राहते आणि एडेनोसिनवर परिणाम करत राहते. म्हणूनच, अनेक लोकांसाठी, दुपार किंवा संध्याकाळच्या वेळी कॅफिन घेतल्यास रात्री झोपणे कठीण होते. एडेनोसिन सिग्नलमध्ये व्यत्यय आणून, कॅफिन आपली झोप अधिक विस्कळीत करू शकते आणि एकूण झोपेचे प्रमाण कमी करू शकते. हे विशेषतः आपल्या गहन नॉन-रॅपिड आय मुव्हमेंट (NREM) झोपेसाठी खरे आहे. एकूणच, संशोधनातून हे स्पष्टपणे दिसून येते की आपण जितके उशिरा आणि जास्त कॅफिन घेतो, तितका तो आपल्या झोपेसाठी वाईट आहे.

कॅफिन कमी केल्यावर आपली स्वप्ने अधिक स्पष्ट होतात का, यावर थेट फारसे संशोधन उपलब्ध नाही. बहुतांश अभ्यास कॅफिनचा झोपेवर कसा परिणाम होतो यावर लक्ष केंद्रित करतात, स्वप्नांवर काय परिणाम होतो यावर नाही. पण, याचा अर्थ असा नाही की आपल्याला काहीच माहिती नाही.

आपल्याला माहीत आहे की झोपेची गुणवत्ता आणि स्वप्न पाहणे यांचा जवळचा संबंध आहे. जरी कोणताही थेट पुरावा नसला तरी, लोक वारंवार एकच गोष्ट सांगतात. त्यांनी कॅफिन कमी केले आणि काही रात्रींतच त्यांची स्वप्ने अधिक स्पष्ट, सविस्तर किंवा फक्त विचित्र वाटू लागली. कॅफिन कमी केल्याने थेट स्पष्ट स्वप्ने पडत नाहीत, पण त्यांच्यात एक संभाव्य संबंध आहे. कॅफिन एकूण झोप कमी करू शकते आणि रात्रीचे जागे होणे वाढवू शकते, विशेषतः जेव्हा ते दिवसा उशिरा सेवन केले जाते. त्यामुळे, कॅफिनचे सेवन कमी केल्याने शरीराला 'पुन्हा पूर्ववत' होण्याची संधी मिळते. जेव्हा आपल्याला जास्त झोप मिळते, तेव्हा रॅपिड आय मुव्हमेंट (REM) झोपेचे प्रमाण वाढू शकते.

# डायनासोरयुग संपवणाऱ्या लघुग्रहाचे गूढ

सुमारे ६६ दशलक्ष वर्षांपूर्वी, डायनासोरच्या युगाचा अंत झाला. १२ किलोमीटर रुंद असलेला एक लघुग्रह ताशी ४३,००० किमी वेगाने पृथ्वीवर आदळला. या आघातामुळे अनेक विनाशकारी घटनांची मालिका सुरू झाली, ज्यामुळे डायनासोरचा पाचवा सामूहिक संहार झाला. केवळ काही पक्षी ळता इतर सर्व डायनासोर प्रजाती नष्ट झाल्या. पण, माऊंट एव्हरेस्टच्या आकाराच्या या लघुग्रहाचे काय झाले?



युनिव्हर्सिटी ऑफ टेक्सास (ऑस्टिन) येथील रिसर्च प्रोफेसर सीन गुलिक यांनी सांगितले की, 'दुसऱ्या महायुद्धातील ८ अब्ज अणुबॉम्बच्या ऊर्जेसह तो पृथ्वीवर आदळला, तेव्हा तो लघुग्रह अक्षरशः वाफेत रूपांतरित झाला.'तो लघुग्रह 'एक बारीक धूळ बनून वरच्या वातावरणात पोहोचला आणि नंतर संपूर्ण ग्रहावर पावसासारखा खाली आला.' गुलिक यांच्या म्हणण्यानुसार, अनेक दशके लघुग्रहाची ही धूळ पृथ्वीवर पडत राहिली, ज्यामुळे इरिडियमचा पातळ थर तयार झाला, ज्याला आता 'इरिडियम ॲनोमली' म्हणून ओळखले जाते.

पृथ्वीच्या कवचातील (crust) इतर कोणत्याही भागापेक्षा यात ८० पट जास्त इरिडियम आहे. इरिडियम लघुग्रहांमध्ये मोठ्या प्रमाणात केंद्रित असते, परंतु पृथ्वीच्या बाह्य कवचात ते जवळजवळ नसते. ६६ दशलक्ष वर्षांपूर्वीच्या या थराला डायनासोर-संहारक लघुग्रहाशी जोडणारा हा एक महत्त्वाचा पुरावा आहे. या लघुग्रहाचा एकमेव ज्ञात तुकडा तीळाएवढा मोठा असून तो UCLA चे भू-रसायनशास्त्रज्ञ फ्रँक काईट यांनी शोधला आहे. १९९८ मध्ये 'नेचर' जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका लेखात, काईट यांनी सांगितले की, त्यांना हा तुकडा हवाईजवळ केलेल्या एका ड्रिलिंगमधील नमुन्यात सापडला.

२०२२ मध्ये आणखी काही लहान तुकडे सापडल्याचा दावा करण्यात आला होता, परंतु त्या दाव्याला इतर वैज्ञानिकांनी मान्यता दिलेली नाही. गुलिक म्हणाले, 'जर आपल्याला एखादा मोठा तुकडा सापडला, तर आपण त्या लघुग्रहाने अनुभवलेल्या 'धक्क्याच्या प्रक्रियेबद्दल' अधिक माहिती मिळवू शकू आणि त्यातील दाब आणि तापमानाबद्दल अधिक अचूक अंदाज लावता येईल. 'या लघुग्रहाने त्याच्या प्रवासाविषयी अनेक अतिरिक्त सुगावे मागे ठेवले आहेत, ज्यात त्याने तयार केलेला मोठा विवर समाविष्ट आहे.

सध्या मेक्सिकोमध्ये असलेले 'चिकसुलुब विवर' सुमारे १८० किमी रुंद आणि २० किमी खोल आहे. या विवराला लघुग्रहाच्या प्रचंड आघाताची मोठी खूण आहे. एका शहराच्या नावावरून हे नाव देण्यात आले आहे. हे विवर लाखो वर्षांमध्ये खडकांखाली आणि गाळाखाली दबून गेले आहे आणि त्याचा मोठा भाग मेक्सिकोच्या आखाताखाली लपलेला आहे. पण, त्याच्या किनाऱ्यावरील कमकुवत चुनखडकात तयार झालेले गोल खड्डे आजही पृष्ठभागावरून दिसतात.

# थोरात यांच्या नेतृत्वात संगमनेरची सर्वांगीण प्रगती : खा. सुप्रिया सुळे




**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

थोरात परिवाराने सात दशकाहून अधिक काळ महाराष्ट्राची सेवा केली असून महाविकास आघाडीचे प्रमुख नेते बाळासाहेब थोरात यांनी कायम समाजातील गोरगरीब, सर्वसामान्य आणि शेतकऱ्यांसाठी सातत्याने काम केले आहे. सर्वांना सोबत घेऊन जाणारे स्वच्छ व पारदर्शी काम करणारे माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांचे नेतृत्व असून त्यांच्या नेतृत्वामुळेच संगमनेर तालुक्याची सर्व क्षेत्रात सर्वांगीण प्रगती झाली असल्याचे गौरवोद्गार संसदरत्न खा. सुप्रिया सुळे यांनी काढले.

रविवारी खा. सुप्रिया सुळे यांनी अमृत उद्योग समूहातील विविध संस्थांना सदिच्छा भेट दिली, यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे संदीप वर्पे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, सुधीर म्हस्के, कारखान्याचे कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, दूध संघाचे कार्यकारी संचालक डॉ. सुजित खिलारी यांच्यासह विविध कार्यकर्ते व अमृत उद्योग समूहातील अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी खा. सुप्रिया सुळे यांनी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याची नवीन प्रशासकीय इमारत, राजहंस दूध संघ, अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेज, अमृतवाहिनी बँक, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांचे प्रेरणास्थळ व अमृतेश्वर मंदिर यांसह सर्व सहकारी संस्थांना भेटी दिल्या.

यावेळी खा. सुप्रिया सुळे म्हणाल्या, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी सहकारामध्ये स्वच्छ व पारदर्शक कामातून देशाला दिशा दिली. माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर मध्ये सहकारात शेतकरी व सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून काम होत आहे. अद्यावत साखर कारखाना, दूध संघ, बँक या सर्व सहकारांमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. संपूर्ण देशाला प्रेरणादायी ठरावे असे काम येथे आहे. अत्यंत पारदर्शीपणे येथील सहकार चळवळ काम करत असून यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी निर्माण झाली आहे.

माजीमंत्री बाळासाहेब थोरात हे महाविकास आघाडीतील प्रमुख नेते असून त्यांनी राज्यभरात विविध मंत्रिपदाच्या माध्यमातून आणि काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून मोठे काम केले आहे. याचबरोबर संगमनेर तालुक्यात सातत्याने विकासाच्या योजना राबवून हा तालुका शेती, सहकार, दुग्ध व्यवसाय, शिक्षण, समृद्ध बाजारपेठ, मोठमोठी विकास कामे आणि प्रगतीतून अग्रेसर बनवला आहे.

कोणतेही काम एका दिवसात होत नाही. त्यामागे कष्ट आणि मेहनत असते. माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी एकही दिवस विश्रांती न घेता सातत्याने काम केले. आणि त्यातून हा तालुका विकासातून फुललेला दिसतो आहे. संगमनेर मध्ये सुख - समृद्धी, समाधान आहे. आणि याचे श्रेय हे माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांना आहे. सत्ता येते आणि जाते, काम हे सर्वसामान्य जनतेसाठी करायचे असते. लोक नेतृत्व हे फक्त निवडणुकीपुरते नसून जनतेच्या हृदयात असते. आणि बाळासाहेब थोरात हे कायम जनतेच्या हृदयात आहेत.

यावेळी त्यांनी प्रेरणास्थळ, यशवंततीर्थ, वसंततीर्थ अभिवादन केले तर कारखान्यांमध्ये नवीन कारखान्याची पाहणी केल्यानंतर अद्यावत अशा प्रशासकीय इमारतीची पाहणी केली. सहकारात इतकी अद्यावत आणि वैभवशाली इमारत फक्त संगमनेर मध्येच निर्माण झाली असल्याचेही त्यांनी आवर्जून यावेळी नमूद केले.

- निळवंडे धरण व कालव्यासाठी सातत्याने पाठपुरावे करणारे माजी मंत्री बाळासाहेब थोरात आहेत. त्यांनी खरे काम केले कधीही प्रसिद्धी केली नाही. मात्र ज्यांनी काम केले नाही अशी मंडळी आता श्रेय घेत आहेत मात्र जनतेला खरे माहित आहे. संगमनेर तालुक्यामध्ये विविध वैभवशाली इमारती, पायाभूत सुविधा,रस्ते, गावोगावी विकासाच्या योजना, ग्रामीण अर्थव्यवस्था, समृद्ध बाजारपेठ हे सर्व माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वामुळेच उभे राहिले असून यापुढील काळात तालुका कायम त्यांच्या पाठीशी भक्कम उभा राहील असा विश्वास खा. सुप्रिया सुळे यांनी व्यक्त करून त्यांच्या नेतृत्वाची राज्याला गरज असल्याचे त्या म्हणाल्या.

# त्रासाला कंटाळून शहरवासीयांचा नगरपरिषदेवर मोर्चा!

## आठ दिवसात उपाययोजना करा अन्यथा मोठे आंदोलन करू

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



सुरक्षित, सुसंस्कृत व वैभवशाली असलेल्या संगमनेर शहरामध्ये प्रशासकीय राजवटीत मोठ्या प्रमाणात अस्वच्छता वाढली आहे, अनियमित लाईट व पाणीपुरवठा याचबरोबर अवैध फ्लेक्सबाजी, मोकाट जनावरांच्या त्रासाला कंटाळून संगमनेर शहरातील नागरिकांनी सोमवारी दुपारी नगर परिषदेवर मोर्चा काढत येत्या आठ दिवसात प्रभावी उपाययोजना करा, अन्यथा मोठे आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा शहरवासीयांनी दिला.

संगमनेर मधील नागरिकांच्या वतीने नगरपरिषदेवर मोर्चा काढून निवेदन देण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्षा दुर्गा तांबे, सोमेश्वर दिवटे, गजेंद्र अभंग, बादल जेथे, शैलेश कलंत्री, शुभम परदेशी, सिद्राम दीदी, निखिल पापडेजा, हैदर आली, संदीप लोहे, नाना वाघ, डॉ. दानिश, सतीश आहेर, अ‍ॅड.प्रकाश कडलग, किरण पाटणकर, मंगला बाळसराफ, सलीम रंगरेज, वैशाली आडेप, अफजल शेख, अभय खोजे, नूर मोहम्मद शेख, अंबादास आडेप, सुभाष दिघे, एकनाथ श्रीपाद, सचिन खाडे, गोपी जहागीरदार, अलोक बर्डे, प्रमोद गणोरे, जावेद शेख, प्रवीण दीड्डी, बाळासाहेब पवार, निरंजन सातपुते, कमलेश सोनवणे, तुषार पवार, विशाल सस्कर, नदीम कुरेशी, मुजीब खान, बालम पठाण, मुन्ना शेख, प्रमिला अभंग, वैशाली बर्गे, सुरेश झावरे, संतोष सातपुते, सिकंदर शेख, संतोष मुर्तडक, तुकाराम शिरोळे, नितीन अभंग, ईश्वर फाफळे, सुनील सस्कर, गीता सस्कर, विजय पवार, सुनिता कांदळकर आदींसह विविध नागरिक उपस्थित होते.

प्रशासनाला दिलेल्या या निवेदनात म्हटले आहे की, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहरासाठी थेट निळवंडे धरणातून पाईपलाईन कार्यान्वित झाली मात्र सध्या शहरांमध्ये अपूर्ण दाबाने पाणीपुरवठा होत आहे. तो सुरळीत व्हावा. स्वच्छ संगमनेर सुंदर संगमनेर असणाऱ्या शहरात सध्या खूप अस्वच्छता वाढली आहे.यामुळे डास वाढले असून आजाराचे प्रमाण वाढले आहे. शहरातील स्ट्रीट लाईट वेळेवर सुरू होत नाही. कचरा उचलला जात नाही. अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहे. अनेक विजेच्या तारांवर झाडांच्या फांद्या लोंबकळलेल्या आहेत. शहरांमध्ये मोकाट गाई, कुत्रे, डुकरे वाढले असून या प्राण्यांचा बंदोबस्त तातडीने करावा तसेच सुलभ शौचालय, युरिनल यांची स्वच्छता नियमितपणे करावी तेथे नळ जोडणी करावी. शहरांमध्ये अनेक रस्त्यांची खड्डेमय अवस्था झाली असून हे सर्व खड्डे तातडीने बुजवावे तसेच साईड पट्ट्यांवरील माती उचलून रस्ते स्वच्छ ठेवावेत.

संगमनेर शहरात अनेक ठिकाणी अनाधिकृत राजकीय फ्लेक्स लागलेले आहेत. जे मागील सहा महिन्यापासून लोंबकळत आहे. त्यामुळे शहराचे विद्रूपीकरण होत आहे. हे सर्व फ्लेक्स तातडीने काढले जावेत. तसेच संगमनेर शहरामध्ये स्वच्छतेसह नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात अशी मागणी करण्यात आली.

यावेळी सर्व आंदोलकांनी नगरपालिकेच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करून हे आंदोलन केले. यानंतर मुख्याधिकारी मती धनश्री पवार, नगरपालिकेचे विविध विभाग प्रमुख यांनी निवेदन स्वीकारून तातडीने उपाययोजना करू असे आश्वासन दिले. येत्या आठ दिवसांमध्ये जर या समस्या सुटल्या नाहीत तर शहरातील नागरिक चक्काजाम आंदोलन करतील असा इशारा आंदोलकांच्या वतीने देण्यात आला. यावेळी विविध युवक कार्यकर्ते व महिला यांनी आक्रमक होत नगरपालिकेच्या कामकाजाचे वाभाडे काढले.

# भोसले कुटुंबीयांचे पालकमंत्र्यांकडून सांत्वन

**नायक वृत्तसेवा, झरेकाठी**



संगमनेर तालुक्यातील साकूर जवळील बिरेवाडी येथील बालाजी उद्योग समूहाचे संस्थापक बाबासाहेब भोसले यांचे पुतणे चि. श्रेयस संजय भोसले (बालु) याचे दिपावली पाडव्याच्या दिवशी दुःखद निधन झाल्याने भोसले कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. श्रेयस याच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील व आ. अमोल खताळ यांनी भोसले कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेत त्यांना धीर दिला. यावेळी स्व. श्रेयश याच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करत मंत्री विखे व आमदार खताळ यांनी श्रद्धांजली अर्पण केली. श्रेयसचे अत्यंत कमी वयात निधन झाल्याने मंत्री विखे पाटील यांनी दुःख व्यक्त करत भोसले कुटुंबियांना धीर दिला. तसेच बाबासाहेब भोसले यांच्याशी मंत्री ना. विखे पाटील यांनी चर्चा केली.

यावेळी शिवसेना पक्षाचे प्रवक्ते संजीव भोर, रऊफ शेख, बाळासाहेब खेमनर,गुलाब भोसले, रामभाऊ रहाणे, भाजपा बुथ प्रमुख सोमनाथ डोळे,हरिभाऊ गिते, संदिप खिलारी आदींसह महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाराष्ट्राच्या ‘ड्रीम प्रोजेक्ट’च्या गुणवत्तेचं पितळ उघडं!

**नायक वृत्तसेवा, कोपरगाव**



- ‘समृद्धी’चा भराव ढासळणं ही केवळ तांत्रिक चूक नाही, तर हे जनतेच्या सुरक्षिततेशी खेळणं आहे. या अत्यंत गंभीर घटनेने रस्ते विकास महामंडळाच्या कामावर आणि ठेकेदारांच्या गुणवत्तेवर मोठं प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. तातडीने महामार्गाची गुणवत्ता तपासण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. महाराष्ट्राच्या ‘प्रगती’च्या मार्गावर निर्माण झालेलं हे ‘संकट’ तातडीने दूर न केल्यास, भविष्यात मोठ्या आपत्त्यांना आणि जीवितहानीला सामोरं जावं लागेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

कोपरगावमध्ये झालेल्या मुसळधार पावसाचा फटका समृद्धी महामार्गालाही बसला असून शिर्डी इंटरचेंजजवळील भराव ढासळला आहे. या महामार्गासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले. मात्र तरीही बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शनिवारी रात्री कोपरगाव तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले. अशात अतिवृष्टीचा मोठा फटका थेट हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाला बसला आहे. कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण शिवारातून जाणाऱ्या समृद्धी महामार्गाच्या शिर्डी इंटरचेंजवर काही भागातील भराव ढासळल्याची गंभीर घटना समोर आली आहे. यामुळे समृद्धी महामार्गाच्या बांधकामाच्या गुणवत्तेवर आणि भविष्यातील सुरक्षिततेवर मोठं प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.शनिवारची रात्र कोपरगाव तालुक्यासाठी केवळ जनजीवन विस्कळीत करणारी ठरली नाही, तर महाराष्ट्राचा ‘ड्रीम प्रोजेक्ट’ असलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाच्या गुणवत्तेवर आणि सुरक्षिततेवर घाला घालणारी ठरली आहे. ‘विकास’ आणि ‘प्रगती’चे प्रतीक मानल्या जाणाऱ्या या महामार्गाचा भराव, एकाच रात्रीच्या मुसळधार पावसासमोर अक्षरशः पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे ढासळला आहे.

कोकमठाण शिवारात घडलेल्या या घटनेने समृद्धी महामार्गाच्या बांधकामातील ‘भोंगळ’ कारभाराचं आणि निकृष्ट गुणवत्तेचं पितळ उघडं पाडलं आहे. एका बाजूला कोट्यवधी रुपये खर्च करून ‘जागतिक दर्जाचा’ महामार्ग उभारल्याचे दावे केले जात असताना, दुसरीकडे निसर्गाच्या एकाच आघाताने महामार्गाच्या पायालाच सुरूंग लागला आहे. पावसाच्या पाण्याच्या प्रवाहापुढे महामार्गासाठी वापरलेला मातीचा आणि दगडांचा भराव पूर्णपणे वाहून गेला आहे किंवा प्रचंड प्रमाणात खचला आहे. या घटनेमुळे महामार्गाच्या या भागातील पायाच कमकुवत झाला असून, भविष्यात हा रस्ता कधीही खचू शकतो किंवा मोठा अपघात घडवू शकतो, अशी भीती स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

नायक ANCHOR

# डॉ. कलाम यांच्या पुस्तकातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी : डॉ. लिबेकर

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या पुस्तकांपासून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी. तसेच त्यांनी विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झोकून देऊन केलेल्या कार्याचे स्मरण करावे असे प्रतिपादन डॉ. अशोक लिबेकर यांनी केले.

संगमनेर महाविद्यालयात भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीदिनाचे औचित्यसाधून, विद्यार्थी वाचनाचा उपक्रम हाती घेण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. अशोक लिबेकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अरुण गायकवाड, संगमनेर महाविद्यालयाचे प्रभारी ग्रंथपाल प्रा.विशाल जाधव, तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. अशोक लिबेकर म्हणाले की, एआय चा वापर करताना पुस्तकांना विसरू नका. वाचाल तर वाचाल. विद्यार्थ्यांनी आपले लक्ष नियमित अभ्यासाबरोबर ग्रंथालयातील पुस्तकांच्या वाचनावर केंद्रित करावे. डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचे साहित्य विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणादायी आहे. आपल्या जीवनात डॉ. कलामांनी अनेक पुस्तकांचे लेखन केलेले आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना चांगल्या पुस्तकांच्या सहवासातून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधता येतो. त्यामुळे अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात उपलब्ध असणाऱ्या चांगल्या साहित्याचे वाचन करावे, हा वाचन प्रेरणा दिन आपण ज्यांच्या नावे साजरा करतोय ते भारताचे दिवंगत माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम हे व्यक्तिमत्व खूप मोठे आहे. त्यांची जयंती साजरी करताना मनात निश्चितच आनंद होत आहे. विद्यार्थ्यांनी वाचनाचा छंद जोपासावा. कारण त्याला वयाचेही बंधन नसते. डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचे लेखन तरुणाईसाठी नेहमीच नवी दिशा देणारे आहे. असेही डॉ. अशोक लिबेकर यावेळी म्हणाले.

प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड म्हणाले की, महाविद्यालयात भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीच्या निमित्ताने वाचन संस्कृती जोपासण्याची खरी गरज आहे. डॉ.कलामांनी जीवनात सतत संघर्ष केलेला आहे. कष्टातूनच त्यांनी राष्ट्रपतीपदापर्यंत मजल मारली. परंतु कधीही त्यांच्या मनाला गर्वाचा स्पर्शसुद्धा झाला नाही. त्यांच्या स्वभावात असणारा हाडाचा शिक्षक आयुष्याच्या शेवटच्या घटकापर्यंत कायम जागृत होता.

ही गोष्ट खूपच लक्षणीय आहे. आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत ते लढत राहिले. आपल्याला मिळणारे मानधन त्यांनी गोरगरिबासाठी देऊन टाकले. त्यांच्याकडे कमालीची सहानभूती होती. त्यांच्या वाढदिवशी आपण वाचन प्रेरणा दिवस साजरा करतो. ही महाविद्यालयीन तरुणांसाठी निश्चितच प्रेरणादायी बाब आहे.

विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात येणाऱ्या नवीन पुस्तकाचे वाचन करून ज्ञानसंपदा वाढविणे आवश्यक आहे. महाविद्यालयात मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने विद्यार्थ्यांनी करावे.भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम अशा थोर असणाऱ्या व्यक्तीच्या जन्मदिनी आपण संकल्प केला पाहिजे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन विजय पाटील यांनी केले तर आभार प्रा. विशाल जाधव यांनी मानले. हा कार्यक्रम संगमनेर महाविद्यालयाच्या ग्रंथालयात संपन्न झाला. यावेळी मोठ्या संखेने शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचा लाभ घेतला.

# राहुरीत दोन न्यायाधिशांचे बंगले फोडले

**नायक वृत्तसेवा, देवळाली प्रवरा**

राहुरी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालय परिसरातील दोन न्यायाधीशांचे बंगले अज्ञात चोरट्यांनी फोडले. या चोरीत नेमका किती मुद्देमाल चोरीला गेला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी यासंदर्भात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिवाणी न्यायाधीश अनुपमा पारशेट्टी व सहदिवाणी न्यायाधीश पंकज पाटील यांचे बंगले फोडल्याचे रविवारी सकाळी उघडकीस आले. राहुरी न्यायालयाच्या पाठीमागे न्यायाधीशांच्या निवासासाठी स्वतंत्र व्यवस्था असून, त्यापैकी दोन बंगल्यांवर ही चोरी झाल्याचे समोर आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. श्वानपथक आणि ठसेतज्ज्ञ पथकास नगर येथून पाचारण करण्यात आले. मात्र, श्वान पथकाला चोरट्यांचा माग घेण्यात यश आले नाही. पत्रकारांनी घटनास्थळी छायाचित्रण करण्याचा प्रयत्न केला असता, पोलिसांनी परवानगी दिली नाही. त्यामुळे या घटनेचे दृश्य दस्तऐवजीकरण होऊ शकले नाही.

दरम्यान, स्थानिक नागरिकांच्या मते राहुरीत पोलिसांची रात्रीची गस्त केवळ कागदावरच चालते, प्रत्यक्षात ती होत नसल्याच्या तक्रारी गेल्या काही महिन्यांपासून केल्या जात आहेत. न्यायाधीशांचे बंगले फोडले जाणे हे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. पोलिसांनी प्राथमिक चौकशीत कोणताही मौल्यवान ऐवज चोरीला गेला नाही, असा खुलासा केला असला, तरी या गुन्ह्याचे तपशील माध्यमांसमोर न आणणे यावरून अनेक शंका उपस्थित होत आहेत.

पाहिजेत
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४



बांधिलकी जनहिताची
# नायक
MAHMAR/2018/75654



जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे (एम.एस.-शल्य) कन्सल्टंट जनरल अ‍ॅण्ड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे (बी.ए.एम.एस.) स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन
सर्जरी
लेझर सेंटर
स्त्रीरोग-प्रसुति
मुळव्याध-भगंदर-फिशर





फॅमिली शॉपिंगचं परफेक्ट ठिकाण!
१९५९ पासून राजेंद्र
मेन रोड, संगमनेर
फोन : 02425-225740,
7901031155


# बहुमजली गृहनिर्माण प्रकल्प उभारण्यात येणार : आ. सत्यजित तांबे

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

बेघर महिलांना हक्काचे घर मिळण्यासाठी आपण प्रयत्नशील असून तीन एकर जागेवर बहुमजली गृहनिर्माण प्रकल्प उभारण्यात येणार असल्याची माहिती आमदार सत्यजित तांबे यांनी दिली.

आमदार सत्यजित तांबे यांच्या पाठपुराव्यामुळे संगमनेरच्या कष्टकरी वर्गाला हक्काचं घर देण्यासाठी प्रशासकीय कामांना वेग आला आहे. सोमवारी आमदार सत्यजित तांबे यांनी संगमनेरातील बेघरांना हक्काचं घर मिळवून देण्यासाठी प्रांताधिकारी कार्यालयात बैठक घेऊन सर्व संबंधित अधिकाऱ्यांसमवेत कामांचा आढावा घेतला. यावेळी प्रांताधिकारी अरुण उंडे, गटविकास अधिकारी सिनारे, नगर परिषदेच्या मुख्याधिकारी धनश्री पवार तसेच महाराष्ट्र कामगार संघटनेचे संगमनेरचे अध्यक्ष सचिन साळुंखे आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

आमदार तांबे म्हणाले, शहरात प्लॉट उरले नाहीत, पण आजूबाजूच्या गावांमध्ये सरकारी जमिनी आहेत. त्या जमिनी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून गृहयोजनेसाठी मिळविण्यासाठी मी प्रयत्नशील आहे तसेच तीन एकर जागेवर बहुमजली गृहनिर्माण प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पात महिलांसाठी सुरक्षित निवास, मुलांसाठी खेळाचे गार्डन व अंगणवाडी आणि स्वच्छतेच्या आधुनिक सुविधा असतील असे ते म्हणाले. पंतप्रधान आवास योजना, बांधकाम कामगार योजना आणि राज्य सरकारच्या विविध गृह योजनांमधून प्रत्येक पात्र महिलेला घर मिळवून देण्यासाठी आपले प्रयत्न सुरू आहेत. ज्यांना घर नाही, जे भाड्याच्या घरात राहतात त्या सर्वांना पुढील दोन वर्षांत संगमनेरमध्ये घर मिळवून देऊ. गुंजाळवाडी, घुलेवाडी आणि सुकेवाडी परिसरातील सरकारी जमिनींचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. या जमिनींवर सोसायटीच्या माध्यमातून घरकुल प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रत्येक महिलेला सोसायटीचे सभासदत्व मिळणार असून नियमानुसार लॉटरी पद्धतीने घरांचे वाटप करण्यात येईल असेही आमदार तांबे यावेळी म्हणाले. बैठकीत सर्व प्रलंबित कामांची माहिती उपस्थितांनी जाणून घेतली.



# आमदारांनी साधला बाजारकरूंशी संवाद!

## लोहारे-मिरपुर आठवडे बाजारास आ. खताळ यांची भेट



**नायक वृत्तसेवा, तळेगाव दिघे**

संगमनेर तालुक्यातील लोहारे-मिरपूर गावात नुकत्याच सुरू झालेल्या आठवडे बाजारास आमदार अमोल खताळ यांनी भेट देत तेथील शेतकऱ्यांशी व बाजारकरूणशी संवाद साधला. या भेटीदरम्यान त्यांनी शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या तसेच त्यांना विविध शासकीय योजनांची माहिती देखील दिली.

लोहारे-मिरपूर ग्रामपंचायतीच्या वतीने दर रविवारी आठवडे बाजार भरविण्यात येत आहे. या बाजारात परिसरातील शेतकरी आपला शेतमाल थेट विक्रीसाठी आणत असून, गावातच माल विकण्याची सुविधा मिळाल्याने शेतकरी समाधानी असून थेट शेतकऱ्यांकडून भाजीपाला उपलब्ध होत असल्याने ग्राहक देखील खुश असल्याचे चित्र येथे पाहायला मिळाले.

आ. खताळ म्हणाले, शेतकऱ्यांचा आत्मविश्वास अन् मेहनतीची जिद्द पाहून अभिमान वाटतो. त्यांनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या कृषी योजनांची माहिती दिली. स्थानिक ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांनी आमदार खताळ यांच्या भेटीबद्दल समाधान व्यक्त केले असून, अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळत असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले. यावेळी त्यांच्या समवेत गणपत मुर्तडक, मोहन मुर्तडक, प्रियंका मुर्तडक, राजेंद्र रणमाळे, दत्तू रणमाळे, शरद मुर्तडक, ज्ञानेश्वर मुर्तडक, वैभव मुर्तडक, कुंदन फिटर यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


ROHNY ELEVATORS PVT. LTD. Be safe with us...
Rise Karega India, Lift Karega Rohny!
भाई ने बोला Rohny Elevators का लिफ्ट इन्स्टॉल करने का तो करने का!
Now In Sangamner
Branches: Nashik I Ch. Sambhaji Nagar I Ahilya Nagar I Pimpri-Chinchwad
0253 2454140 / 7498292802
TOP TEN IMPERIAL
S-5 Second Floor, Sangamner, 422 605, Dist. Ahilyanagar
www.rohnyelevators.com



श्री गणेश शिलाई मशिन
शिलाई मशिन विक्री व दुरुस्तीचे विश्वसनीय ठिकाणी...!
पुणे – नाशिक हायवे, नवघर गल्ली, संगमनेर जि. अ. नगर
9822558815



दर्शन टेक्सटाईल मार्केट
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
स्टायलिश पुरुषांसाठी खास कलेक्शन!
टी शर्ट | जिन्स
फॉर्मल ड्रेस
ब्लेज़र | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605



पाहिजेत
दैनिक नायक मध्ये कामाची सुवर्ण संधी

| पद | जागा | पात्रता |
|---|---|---|
| मार्केटिंग ऑफिसर | 1 | वृत्तपत्र मार्केटिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक |
| अकाऊंटंट | 1 | Tally, GST, हिशेबकामाचा अनुभव आवश्यक |
| वितरण ऑफिसर | 1 | वृत्तपत्र वितरण क्षेत्रातील अनुभव आवश्यक |
| उपसंपादक | 1 | वृत्तपत्रीय क्षेत्रातील अनुभवा बरोबरच संगणकाचे ज्ञान आवश्यक |
| पेपर वितरण | 15 | संगमनेर, अकोले, राहाता, लोणी, कोपरगाव, श्रीरामपूर, राहुरी. स्वतःची सायकल अथवा दुचाकी व पेपर वितरणाचा अनुभव असलेल्यास प्राधान्य |

86690 40880
pancham.prakashan@gmail.com
येथे अर्ज पाठवा
बांधिलकी जनहिताची... नायक सायं. दैनिक
गाळा क्र. AF30 बसस्टँड जवळ,निमाई स्वीटस्च्यां वर संगमनेर,जि. अहिल्यानगर ४२२६०५



KADLAG INVESTMENT
Happy Diwali
Welcoming prosperity and positivity into every moment.
KADLAG INVESTMENT
म्युच्युअल फंड्स • एस.आय.पी. • पी.एम.एस. • एन.पी.एस. • सिस्टीमॅटीक विड्रॉल प्लॅन • सिस्टीमॅटीक ट्रान्सफर प्लॅन • टर्म लाईफ इन्शुरन्स • मेडीक्लेम
एस.- ५, दुसरा मजला, टॉप टेन इम्पिरीअल, यशोधन समोर, संगमनेर
HELP LINE : 91503 06306 | 91425 59000



NATURE EARTH
RESTAURANT & AGRO RESORT
Kolhewadi Phata, Behind Shetkari Agro Clinic, Vadgaon Pan, Sangamner, Dist. A. Nagar
natureagroresort@gmail.com / www.natureagroresort.com 88 477 88 099 / 89 75 40 82 85
CONFERENCE HOLL | RESTAURANT | ROOMS | CONFERENCE PAD



कुटे हॉस्पिटल अ‍ॅण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर • एसी/डिलक्स रुम्स् • महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध • तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ • डायलेसिस विभाग • इन्टरकॉम, टीव्ही • ९ बेडस्चा सुसज्ञ आय.सी.यु. विभाग व सुसज्ञ अपघात विभाग • नर्स कॉल बेल सिस्टिम • गरम पाण्यासाठी सोलर • सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन • सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया • सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध • अत्याधुनिक सुविधा • अ‍ॅम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५